बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १४३ वा | बुधवार दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

dainiklatursamachar@gmail.com

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## जंतनाशक मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ: ३ लक्ष ५३ हजार मुलांना दिली जाणार जंतनाशक गोळी



धाराशिव दि.१२,(जिमाका):- राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त जिल्हास्तरीय मोहिमेचा शुभारंभ आज जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळा,येडशी येथे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांच्या हस्ते झाला.

या मोहिमेचा उद्देश मुलांमधील जंतामुळे होणारा रक्तक्षय व कुपोषण रोखणे हा आहे.जंतामुळे भूक मंदावणे,अशक्तपणा, चिडचिड, पोटदुखी,मळमळ,जुलाब,वजन घटणे व पोटाची सूज अशा तक्रारी उद्भवतात,असे जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी डॉ.कुलदीप मिटकरी यांनी प्रास्ताविकात सांगितले.


दरवर्षी ऑगस्ट व फेब्रुवारी महिन्यात जंतनाशक मोहिम राबवली जाते. यंदा ग्रामीण भागातील १ ते १९ वयोगटातील ३ लक्ष ५३ हजार ८५३ मुलांना ११ ते २० ऑगस्ट दरम्यान अल्बेन्डॅझॉलची गोळी दिली जाणार आहे.शाळेत अनुपस्थित किंवा आजारी असलेल्या विद्यार्थ्यांना २१ ते ३० ऑगस्ट या मॉप-अप कालावधीत गोळी दिली जाईल,अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास यांनी दिली.

गोळी देताना ती अंगणवाडी सेविका, आशा,शिक्षक किंवा आरोग्य सेवक यांच्या उपस्थितीतच खाऊ घालण्यात येणार आहे.गोळी खाल्ल्याने मुलांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते,शारीरिक व बौद्धिक विकास सुधारतो,असे डॉ. घोष यांनी सांगितले.

तसेच जंताचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नखे स्वच्छ ठेवणे,वेळेवर कापणे,पायात चप्पल/बूट वापरणे,उघड्यावर शौच टाळणे,हात साबणाने धुणे यासारख्या सवयी अंगीकाराव्यात,असे त्यांनी आवाहन केले.

या प्रसंगी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी फुलारी,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रमोद गिरी,गट शिक्षण अधिकारी असरारजी सय्यद,सरपंच डॉ.सोनिया पवार,मुख्याध्यापक व्ही.जी.नाईकवाडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रनिता क्षिरसागर यांच्यासह जिल्हा व तालुकास्तरीय अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

## पावसाने धाराशिवच्या रस्त्यांवर साचले पाणी: निवेदने, आंदोलनानंतरही रस्त्यांचा समस्या कायम



धाराशिव (प्रतिनिधी)-शहरात पाऊस झाला. त्यामुळे राजमाता जिजाऊ चौक ते लेडीज क्लब रोडवर, बसस्थानकासह समता नगर, वैराग रोड व शहराच्या अन्य काही भागात पाणी साचले. त्यामुळे सायंकाळी घरी जाणाऱ्या धाराशिवकरांना कसरत करावी लागली.

सायंकाळी शाळा, कॉलेज सुटण्याच्या वेळी पाऊस सुरू होता. प्रमुख बाजारपेठेत खरेदीसाठी आलेल्या नागरिकांना भिजत घरी जावे लागले. देशपांडे स्टँड परिसरात भाजीपाला विक्रेत्यांना भाजीपाला झाकून ठेवावा लागला. देशपांडे स्टँड परिसरात पावसाने काही काळ वाहतूक कोंडी झाली.

नेहरू चौकात रस्त्यावर पाणी साचल्याने नागरिक त्यातून वाट काढत होते. बसस्थानकात मोठे खड्डे पडले असून त्यात पाणी साचल्याने चिखलयुक्त पाणी प्रवाशांच्या आंगावर उडत होते. याच खड्ड्यातून बसची ये-जा सुरू असल्याने खड्डे अधिक खोल होत आहेत. आगाराकडून कोणतीही उपाययोजना होत नाही.

पावसाने शहर पोलीस स्टेशन परिसर, बाजारपेठ, तुळजापूर नाका, वैराग नाका, समता नगरातील अंतर्गत भागातील रस्त्यांवर पाणी साचले.निवेदने, आंदोलनानंतरही रस्त्यांचा समस्या कायम आहे हे नक्की!

## कपालेश्वर मंदिरात हरिनाम सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास सुरूवात

धाराशिव श्रावण महिन्यानिमीत्त धाराशिव शहरातील ग्रामदैवत श्री कपालेश्वर मंदिरात दि.९ ते दि.१६ ऑगस्टपर्यत ७ दिवस अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

अखंड हरिनाम सप्ताहानिमीत्ताने मंदिरात दररोज पहाटेपासून रात्री उशिरापर्यत विविध धार्मिक कार्यक्रम सुरु आहेत. अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यानिमीत्त श्री कापलेश्वर मंदिरात दररोज पहाटे काकडा आरती त्यानंतर पूजापाठ, अभिषेक, हरिनामाचा गजर तर दुपारी प्रसाद तर सायंकाळी सायंकाळी हरिकीर्तन होत आहे. श्री कपालेश्वर मंदिरात सोमवारी ग्रामदैवत कपालेश्वरांच्या मूर्तीला विविध पांढऱ्या फुलांची आरास करुन महादेवाची विशेष पूजा करण्यात आली होती.

मंदिरात दि.९ ऑगस्ट रोजी हरिनाम अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला सुरुवात झाली आहे. ९ ऑगस्ट रोजी सुधाकर महाराज इंगळे यांचे कीर्तन पार पडले. सोमवारी हरिनामाचा गजर व त्यानंतर दुपारी उपस्थित भाविकांना अन्नदान करण्यात आले. तर सायंकाळी ७ नंतर वामन महाराज शेळके यांचे हरिकीर्तन पार पडले. उद्या मंगळवार शिवशंभू चरित्रकार तानाजी महाराज भोईटे, रुईभर यांचे कीर्तन होईल. तर बुधवारी दि.१३ ऑगस्ट रोजी शाम महाराज सोनवणे यांचे कीर्तन होईल. गुरुवार दि.१४ ऑगस्ट रोजी हभप नवनाथ महाराज, चिखलीकर यांची कीर्तन होणार आहे. तर शुक्रवार दि.१४ ऑगस्ट रोजी हभप लक्ष्मण महाराज चौगुले यांचे हरिकीर्तन होणार आहे. शनिवारी भागवताचार्य जगन्नाथ महाराज शिरसागर, देवळाली यांच्या काल्याचे किर्तनाने हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता होणार आहे. शुक्रवारी श्री ज्ञानेश्वरी पारायण समाप्तीची महाआरती पालकमंत्री प्रतापजी सरनाईक तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंखे यांच्या हस्ते होणार आहे. शनिवारी खासदार ओमराजे निंबाळकर आमदार कैलास दादा पाटील, नंदू भैया राजे निंबाळकर यांच्या हस्ते महाआरती होणार आहे. दि.१४ ऑगस्ट रोजी दुपारी २ ते ५ भारुडाचा कार्यक्रम श्री कपालेश्वर मंदिरात होणार आहे. याचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री कपालेश्वर मंदिर सप्ताह समिती धाराशिवतर्फे करण्यात आले आहे. तिसऱ्या सोमवारीही शिवमंदिरात गर्दी : शहरातील राजेबाग मंदिर, भवानी चौकातील श्री महादेव मंदिर, कपालेश्वर मंदिरासह येडशीतील रामलिंग, वडगाव सिद्धेश्वर येथेही शिवभक्तांची सकाळपासूनच दर्शनासाठी गर्दी झाल्याचे पहायला मिळाले. भवानी चौकातील महादेव मंदिरातही श्रावण सोमवारनिमित्त पूजा, अभिषेक, आरती, अखंड हरिपाठ, महिला भजनी मंडळातर्फे भजनसेवा सुरु आहे. होईल. पहाटे ५:३० पासूनच विविध मंदिरे शिवभक्तांसाठी दर्शनासाठी खुली ठेवण्यात आली होती.

## पोलिसांची जुगार विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान धाराशिव ग्रामीण पोलीसांनी दि.११.०८.२०२५ रोजी धाराशिव ग्रामीण पो ठाणे हद्दीत येडशी रामलिंग मंदीराचे पाठीमागे छापा टाकला. यावेळी आकाश वय २६ वर्षे,स्वप्नील रामेश्वर , वय २० वर्षे,आशुतोष नितीन, वय २२ वर्षे, प्रशांत ,वय २६ वर्षे, रा. रामलिंगनगर येडशी ता. जि. धाराशिव हे १४.३० वा. सु. येडशी रामलिंग मंदीराचे पाठीमागे अडी/टायगर मटका जुगाराचे साहित्य एकुण ५,६०० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले धाराशिव ग्रामीण पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम- १२(अ) अन्वये धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## 'वाहतुक शाखेने 'तडजोड शुल्क'वसुल केली

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.११ऑगस्ट रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २७९ कारवाया करुन २,१६,३०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## क्राईम न्युज

### अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- मुरुम पोलीस ठाणे अंतर्गत निळकंठ रा. कडोदरा ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.११.०८.२०२५ रोजी कडोदरा गावालगतचे साठवण तलावा लगत असलेल्या पत्री शेड समोर अंदाजे २,४०० किंमतीची २४ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

### रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

मुरुम पोलीस ठाणे अंतर्गत विठ्ठल रा. दस्तापुर ता. लोहारा जि. धाराशिव,श्रीधर रा. जळकोट ता. तुळजापूर जि. धाराशिव, दिपक रा. महालिंगरायवाडी ता. उमरगा जि. धाराशिव, दत्तात्रय रा. आष्टाकासार ता. लोहारा जि. धाराशिव,लक्ष्मण रा. खैराट ता. अक्कलकोट जि. सोलापूर यांनी दि.११.०८.२०२५ रोजी ११.००ते १२.०० वा. सु. आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे पे रिक्षा एमएच २४ एम ६६७६, ॲपे रिक्षा क्र एमएच २५एम ५८३, पे रिक्षा क्र एमएच २५ ए.के. १४२१,पे रिक्षा क्र एमएच २५ एम १३७३ व पे रिक्षा क्र एमएच २५ एम ०८९२ ही वाहने एनएच ६५ नळदुर्ग ते उमरगा जाणारे सार्वजनिक रोडवर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना मुरुम पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये मुरुम पो.ठा. येथे स्वतंत्र ५ गुन्हे नोंदवले आहेत.

### मोटार,स्टार्टर,केबल आदिची अज्ञातने केली चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-अनंत नानासाहेब लंगडे, वय ४८ वर्षे, रा. कोठाळवाडी ता. कळंब जि. धाराशिव यांचे भावजयी यांचे मालकीचे कोठाळवाडी शिवारातील शेत गट नं ४२० मधील विहीरीवरील ईकोजन कंपनीची ५ एच पी मोटार, स्टार्टर,२०० फुट केबल एकुण ३२,००० किंमतीचा माल हा दि.०८.०८.२०२५ रोजी २१.०० वा. सु. ते दि. ०९.०८.२०२५ रोजी ०७.३० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अनंत लंगडे यांनी दि.११.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

झाडे लावा!
झाडे जगवा!!
झाडे तोड रोखा !!!

## अवयवदान जनजागृती पंधरवडा जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आणण्याचे आवाहन

धाराशिव दि.१२, (जिमाका):-जिल्ह्यात 'अंगदान-जीवन संजीवनी अभियान' अंतर्गत ३ ते १५ ऑगस्ट २०२५ दरम्यान 'अवयवदान जनजागृती पंधरवडा' उत्साहात राबविला जात आहे.३ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये आरोग्य व शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने प्रभात फेरीद्वारे जनजागृती करण्यात आली. आतापर्यंत जिल्ह्यात ३२४१ ऑनलाईन अवयवदान शपथ नोंदणी झाली असून,धाराशिव जिल्हा राज्यात ७ व्या क्रमांकावर आहे. जिल्ह्याला प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घ्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले.



अभियानाचा एक भाग म्हणून १२ ऑगस्ट रोजी दुपारी ३.०० ते ४.०० या वेळेत १३३९ आशा स्वयंसेविकांसाठी यूट्यूब लाईव्हद्वारे ऑनलाईन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.राज्य आशा कक्ष व राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या प्रशिक्षणात अवयवदानाचे सामाजिक,वैद्यकीय व नैतिक महत्त्व,आवश्यक माहिती तसेच संवाद कौशल्य याबाबत मार्गदर्शन केले जाईल.

प्रशिक्षणासाठी नोंदणी https://tinyurl.com/RegisterAASHA या लिंकवर तर थेट सहभागासाठी https://tinyurl.com/OD-warenessBatch2 या लिंकवर जावे.आशा स्वयंसेविकांच्या माध्यमातून गावोगावी जनजागृती होऊन अवयवदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण करण्यास या प्रशिक्षणाला विशेष महत्त्व आहे. अवयवदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, मेंदूमृत व्यक्तीचे अवयव अनेक रुग्णांचे प्राण वाचवू शकतात.मात्र यासाठी समाजात विश्वास निर्माण करणे,गैरसमज दूर करणे व अंधश्रद्धा मोडणे आवश्यक आहे.आशा स्वयंसेविकांच्या प्रयत्नांतून धाराशिव जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर येईल,असा विश्वास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास यांनी व्यक्त केला.

## अज्ञात मृत व्यक्तीच्या ओळखीबाबत आवाहन

धाराशिव (जिमाका):- पोलीस ठाणे धाराशिव (शहर) येथे एका वृद्ध इसमाचा आकस्मिक मृत्यू झाल्याची नोंद असून,त्याच्या ओळखीबाबत माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मयताचे नाव आप्पा शंकर गायकवाड (वय अंदाजे ९० वर्षे, रा.थेरगाव, पुणे) असून,२६ जून २०२५ रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास आर.टी.ए.अपघातात जखमी झाल्याने १०८ ॲम्ब्युलन्स (क्र. एमएच-१४ सीएल १०२८) द्वारे धाराशिव येथील सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान २७ जुलै २०२५ रोजी सकाळी ८.४५ वाजता त्यांचा मृत्यू झाला.सध्या त्यांचे शव शीतगृहात ठेवण्यात आले आहे.

मयताचे शारीरिक वर्णन खालीलप्रमाणे आहे.

रंग : सावळा.डोक्याचे केस: पांढरे,अर्धवट टक्कल.चेहरा- सुरकुत्या,डोळे खोल गेलेले.

अंगावर: फिकट निळसर रंगाचा कपडा,खाली पांढऱ्या रंगाचा कपडा या व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी माहिती असणाऱ्यांनी



श्री.क-हाळे (मो. ९२८४८६८९९२) किंवा श्री. दराडे (मो. ९६५७७०९८४१) यांच्याशी संपर्क साधावा,असे आवाहन धाराशिव (शहर) पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनी केले आहे.

## झाडांना राख्या बांधून जतन, संगोपनाची घेतली जबाबदारी, प्रभात मॉर्निंग ग्रुपने केली हजारो झाडांची जोपासना

उमरगा(प्रतिनिधी)-रक्षाबंधन म्हणजे प्रेमबंधन, भावाने बहिणीच्या रक्षणाची घेतलेली जबाबदारी. भारतीय संस्कृतीत या सणाला विशेष महत्त्व आहे. सद्यःस्थितीत पर्यावरणाचा ऱ्हास बघता वृक्षांचे जतन, संरक्षण करण्यासाठी प्रभात मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी झाडांना राख्या बांधून रक्षाबंधन सण साजरा केला.

येथील प्रभात मॉर्निंग ग्रुपने या उपक्रमातून पर्यावरणाच्या विषयी असणारे प्रेम आणि झाडांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे अधोरेखीत केले. बहिणीने भावाला राखी बांधल्याने तो तिचे संरक्षण करतो, ही परंपरा आहे. परंतु झाडालाच आपला भाऊ मानला आहे. त्याला राखी बांधून त्याच्या संरक्षण करण्याची जबाबदारी घेऊन एक परंपरा सुरू केली आहे. त्यामुळे या उपक्रमाचे कौतुक होत आहे. या वृक्षबंधन उपक्रमासाठी प्रभात मॉर्निंग ग्रुपचे माजी सैनिक राजेंद्र झांबरे, व्यापारी अनिल केशवशेट्टी, मारुती जाधव, माजी शिक्षक सिराज मुगळे, विठ्ठलराव जाधव, प्रशांत जाधव, धीरज बेळंबकर, संजय राठोड, ईश्वर मुगळे, राजेंद्र वडदरे, दयानंद उमाटे, दामोदर सूर्यवंशी यांच्यासह सदस्य आणि नागरिक उपस्थित होते. आनंदात कार्यक्रम पार पडला.

यावेळी 'भविष्यात कोणतेच झाड तोडणार नाही, झाडे लावून त्यांचे संवर्धन व संगोपन करण्याची' शपथ ज्येष्ठ सदस्य कमलाकर भोसले यांच्यासह सर्व सदस्यांनी घेतली. झाडे लावण्याचा संकल्प प्रत्येकाने करावा. यासाठी सर्व नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी आत्मियता निर्माण होणे महत्त्वाचे आहे. पर्यावरण समतोल राखला नाही तर भविष्यात मानवी जीवन नष्ट होईल, असे कमलाकर भोसले म्हणाले.

## बसमध्ये प्रवास करताना १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गठंणची चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-राजश्री महेश कांबळे, वय ५८ वर्षे, रा. कासारवाडी रोड बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर या दि.०८.०८.२०२५ रोजी बार्शी ते ढोकी बस मध्ये प्रवास करत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून राजश्री कांबळे यांचे गळयातील १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गठंण एकुण ३०,००० किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-राजश्री कांबळे यांनी दि.११.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## जनतेच्याप्रश्ना कडे दुर्लक्ष नको

देशात अनेक प्रश्न आहेत. काही जटील प्रश्नही आहेत. ते तातडीने सोडविले पाहिजेत. त्याच प्रमाणे काही प्रश्नाला विरोधी पक्षाची मदत हवी असते. असे जरी असले तरी प्रत्यक्षात काही बाबी जे कायदेशीरपने लढल्यावर सोडविल्या जावु शकतात, त्या जनतेच्या दरबारात आणल्या जात आहेत. लोकशाहीत सत्ताधारीपेक्षा विरोधीपक्षाला अधिक महत्व असते. विरोधीपक्षच सतत एकाच व्यक्तीवर टिका करीत असेल तर ते आवडणारे नाही. टिका केली पाहिजे. तो अधिकार आहे मात्र सतत दहा वर्षापासून एकच व्यक्तीला लक्ष करीत असाल ते पटणारे नाही. दहा वर्षात विरोधकांच्या मताशी किती सहमती जनतेनी दर्शविली आहे याचे मुल्यमापन होणे अपेक्षित आहे. देशाच्या प्रमुख नागरिक म्हणजे पंतप्रधान असतो त्यांना तर दंडा मारण्याची भाषा वापरली जात असेल तर आपण आपल्या देशप्रमुखांचा अपमान केल्यासारखे आहे. आपणच आपल्या व्यक्ती नव्हे तर पंतप्रधान म्हणून मान राखला पाहीजे. जगात ज्या व्यक्तीला मानले जात असेल व आपण शिव्या घालत असेल तर शांतपने विचार केला पाहिजे. दहा वर्षापासून शिव्या घालण्यात वेळ जात असेल तर एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, आपले काही चुकते आहे. घरातच राजकारण अनेक वर्षापासून आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपल्याच घरात सत्ता राहीली व यापुढेही आपल्याहाती राहावी असे वाटत असेल तर जनतेसाठी काही केले पाहिजे. जनतेला शिव्या आवडत नाहीत तर जनतेला वैचारिक लढणे आवडते. आज पर्यंत लोकसभेत विरोधीपक्ष वाल्याची कोणती भुमिका तडीस घेवुन गेले आहेत. वास्तविक जनतेचा पाठींबा मिळाला पाहिजे. लोकसभेत कामकाज चालते त्यावेळी गोंधळ दिसून येतो, तो एक दिवसासाठी बरा वाटतो. मात्र सतत गोंधळाची स्थिती पाहिली तर देशातील नागरिकांना ते आवडत नाही. विरोधकांचा अंकुश असला पाहिजे. सर्वात महत्वाचे राजकारणात मुरलेला नेता असला पाहिजे. जसे मल्लिकार्जुन खरगे आहेत. ते वैचारिक पातळी सोडून बोलत नाहीत. विरोधकांनी मिळून इंडिया आघाडी तयार केली, लोकसभेच्या निवडणुकीनंतर जे असित्व असावयास पाहिजे. ते दिसून येत नाही. त्याच प्रमाणे इंडिया आघाडीच्या बैठका होणे अपेक्षित आहेत. आगामी नियोजनाचा अभाव दिसून येतो. लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडी शांतच दिसून येत नाही. एकमेव विरोधीपक्ष नेता सतत पंतप्रधान यांच्यावरच टिका करीत असतील ते विचार करायाला हवे. त्यांच्याच पक्षातील एक महिला खासदार जर ऑपरेशन सिंदुरला तमाशा म्हणत असतील तर सर्वात मोठे दुर्दैव आहे. प्रसंग काय आहे. भारतीय जवानांनी जीवाची बाजी लावुन एका महिला कॅप्टने केलेल्या कार्याचे कौतुक होत असताना एक महिलाच जर तमाशा म्हणत असतील तर हे वक्तव्य जवानाचे मनोधैर्य खचण्यासारखे आहे. मनोबल वाढविण्याचे काम भारतीयांनी केले पाहिजे. असो, आता तर निवडणुक आयोगाबाबत जे वादळ निर्माण केले जात आहे. नको ते आरोप केले जात आहेत. यात तथ्य किती आहे हे जनतेला पुराव्यानिशी दाखविली पाहिजे. हवेत गोळ्या मारण्यावेक्षा ठोस पुरावे देणे अनेक्षित आहे. निवडणुका पार पडल्यानंतर जर अक्षेप नोंदविले जात असेल तर विचाराबरोबर तथ्य काय आहे याचे आवलोकन करण्यात वेळ लागणार आहे. यामुळे जे संशयाचे वादळ निर्माण होत आहे ते लोकशाहीत योग्य वाटणारे नाही. लोकशाहीत, लोकांच्या प्रश्नाला अधिक महत्व दिले पाहिजे. एक तर आई, भाऊ व बहिण लोकसभेत कार्यरत आहे. विरोधीपक्षनेते पद आपल्याकडे आहे. अशा पक्षाने केवळ अपशब्द बोलणे शोभणारे नाही. यामुळे काहीही शक्य होणार नाही. उलट विरोधाकडे असणारी अनेक राज्य सत्ताधाऱ्यांनी आपल्याकडे खेचण्याचे काम केले आहे. एक काळ असा होता की, देशातील जवळपास सर्वच राज्य काँग्रेसच्या ताब्यात होती. एक-एक करून ते सत्ताधारी पक्षाने आपल्याकडे खेचण्यात यशस्वी झाले. याचा विचार विरोधीपक्षाने केला पाहिजे. काँग्रेसचे योगदान स्वातंत्र्याच्या काळात मोठे आहे. असे जरी असले तरी प्रत्यक्षात पुन्हा अनेक राज्यात आपली सत्ता आणण्यात ते यशस्वी झाले नाहीत. यामागील कारणांचा शोध घेतला जात नाही. पक्ष कोणत का असत नाही. तो जनतेसोबत असला पाहिजे. त्यापेक्षाही एकाच समाज,गटाकडे आकर्षित नसावा. केवळ मतासाठी योग्य भुमिका न निभाविता ठराविकांना गोंजरण्याचे काम होत असेल तर ते पक्षासाठी घातक असते. आज जम्मू-काश्मीरचा विषय कोणामुळे रेंगाळत पडला आहे. सत्ताधाऱ्यांनी ३७० कलम हटविले आहे. तसे हे मोठे धाडस केले आहे. वास्तविक काँग्रेसने करणे अपेक्षित होते. ते काँग्रेसने केले नाही. भाजपा सत्तेत आल्यावर या भागाचा विकास साधला. रेंगाळत ठेवलेल्या प्रश्नामुळे मोठी किंमत चुकवावी लागत आहे. तसे देशात अनेक प्रश्न असे आहेत की, एकटा सत्ताधारी सोडवु शकत नाही, विरोधकांचा तगादा असला पाहिजे. विरोधकांचा पाठींबा असला पाहिजे. तरच देशातील जनतेला विरोधक आता सत्ताधारी बनला पाहिजे अशी भावना निर्माण करणारे काम अपेक्षित आहे. उठसुट मोदी यांच्यावर टिका करणे अपेक्षित नाही. कोणताही पक्ष असो जनतेचा पाठींबा असला पाहिजे. जनतेच्या रेट्यामुळेच पक्षाची प्रतिमा उजळ होते. हे विरोधीपक्ष प्रमुखांना समजले पाहिजे. एक तर देशात सत्ता असताना ती गेली. परत मिळविण्यात यशस्वी होता येत नाही. सतत शिव्या घालणे आवडत नाही. सत्ताधारी कधी विरोधकांना दंडे मारा असे कधीही म्हटले नाही. उलट लोकसभेत पंतप्रधान यांचे भाषण एकले तर दंडे खाण्यासाठी पाठ मजबुत व्हावी म्हणून अधिक सुर्यनमस्काराचा व्यायाम करावा लागेल असे म्हटले आहे. तेही शिव्या घालू शकतात. खालच्या स्तरावर बोलू शकतात. परंतु सत्ताधारी बोलत नाही जेवढे विरोधीपक्ष नेता बोलतो तेवढे! त्यामुळे सत्ताधाऱ्याकडून काही बाबी शिकल्या पाहिजेत. केवळ देखावा म्हणून इंडिया आघाडी असेल तर ते योग्य नाही. जनतेसोबत राहीले तरच विरोधकांची असित्व वाढणार नाही नसता आगामी काळात उतरती कळा निर्माण होवू शकतो.

# विद्यार्थी जात पडताळणी प्रकरणे निश्चित ठराविक कालमर्यादेत निकाली काढण्याची बार्टी महासंचालक डॉ सुनिल वारे यांना संतुजी ब्रिगेडची मागणी

**लातूर/प्रतिनिधी:** दिनांक १२.०८.२०२५ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी)पुणे महासंचालक डॉ सुनिल वारे यांची भेट घेत निवेदनाद्वारे अखिल भारतीय संतुजी ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष अँड प्रदिपसिंह गंगणे , महासचिव अँड अमितकुमार कोथमिरे यांनी विद्यार्थी जात पडताळणी प्रकरणे निश्चित ठराविक कालमर्यादेत निकाली काढण्याची मागणी केली आहे.



महाराष्ट्रातील ११/१२ वर्गात विज्ञान शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व भविष्यात वैद्यकीय,अभियांत्रिकी,औषधनिर्माण शास्त्र,नर्सिंग,एम.बी. ए,एल.एल.बी आदी व्यावसायिक महाविद्यालयात अनुसूचित जाती,जमाती,भटक्या जमाती,ओबीसी,एस.इ.बी सी , एन.टी आदी प्रवर्गाच्या आरक्षणातून प्रवेश घेण्यासाठी वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असते .महाराष्ट्रातील विविध जिल्हास्तरीय जात पडताळणी समितीकडे विहित नमुन्यात व मुदतीत विद्यार्थी प्रस्ताव सादर करून ही अनेक प्रस्ताव प्रलबित राहत आहेत त्यामुळे अनेक विद्यार्थी व पालकांना जात पडताळणी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागते यासाठी मानसिक त्रास ही सहन करावा लागतो आहे,विद्यार्थ्यांना पावती आधारे प्रवेशासाठी नोंदणी करता येते पण प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ठराविक मोजका तीन ते चार दिवसाचाच कालावधी दिला जातो, मुदतीत वैधता प्रमाणपत्र ऑनलाईन सादर न केल्यास अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक नुकसानिस सामोरे जाण्याची भिती आहे.

त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासुन विद्यार्थी व पालकांनची गैरसोय होवु नये,कोणाचेही जात वैधता प्रमाणपत्र अभावी शैक्षणिक नुकसान होणार नाही यासाठी

विद्यार्थी जात पडताळणी प्रकरणे सी इ टी,नीट, विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षेचे निकाल जाहीर होण्यापूर्वीच निश्चित ठराविक कालमर्यादेत जुलै अखेर निकाली काढणे बाबत उचित निर्देश जिल्हास्तरिय जात पडताळणी समित्यांना देण्यात यावेत तसेच अनेक कुटुंब जवळपास ४०/५० वर्ष मुंबई,पुणे,नाशिक व अन्य ठिकाणी पोटापाण्यासाठी स्थलांतरीत झालेले आहेत तर काही महिला कौटुंबीक कलहातून व घटस्फोट झाल्याने माहेरी स्थायिक झाल्याने त्यांच्या तीन/चार पिढ्याचा जन्म,शिक्षण, विवाह आदी झालेले आहेत,त्यांनी किवा त्याच्या पुढील पिढ्यानी शिक्षणासाठी ,घरकुलासाठी,नोकरी आदी कारणासाठी कायद्याच्या अज्ञान पणामुळे जात प्रमाणपत्र काढलेली आहेत तर अनेक जनाची जात प्रमाणपत्र पडताळणी होऊन होवून वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेली आहेत अशा परिस्थितीत इतर त्यांच्याच रक्तनातेवाईकाना महाराष्ट्र अनुसूचित जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्ग जात प्रमाणपत्र देण्याचे अधिनियम २००० व नियम २०१२ कलम ५ (१) अन्वये अर्जदार स्वतः किवा त्यांच्याकडील किवा पणजोबा किवा नातेवाईक हे मानवी दिनाकास ज्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रादेशिक अधिकारितेच्या क्षेत्राच्या आत सर्वसाधारणताः राहत होते त्या सक्षम प्राधिकाऱ्याला अर्जदारास जातीचे प्रमाणपत्र देता येईल,तसेच नियम २०१२ कलम ५(२) अन्वये अर्जदार किवा त्यांचे वडील किंवा पणजोबा त्या सक्षम प्राधिकरणाच्या अधिकारितेच्या क्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी सर्वसाधारण रहिवाशी नसतील तर,अशा क्षेत्रामधील नोकरी,रोजगार,शिक्षण किवा तुरूगातील बंदिवास इत्यादी कारणाने अशा क्षेत्रात अर्जदाराच्या तात्पुरत्या राहण्यामुळे त्या सक्षम प्राधिकार्यास जातीचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकारिता प्रदान केले जाणार नाही यामुळे प्रमाणपत्र,वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी ही अट शिथिल केल्यास विद्यार्थी,पालकांची गैरसोय दूर करण्या बाबत उचित निर्णय घेवून कार्यवाही करण्याबाबत जिल्हास्तरीय जात पडताळणी समितीना निर्देश द्यावेत ही विनंती करण्यात आली आहे

# राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये ग्रंथपाल दिवस साजरा

लातूर- येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये डॉक्टर. एस. आर. रंगनाथन यांची जयंती उत्साहात साजरा करण्यात आली.



प्रथम प्राचार्य कर्नल श्रीनिवासलु यांच्या हस्ते डॉक्टर एस आर रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. डॉक्टर एस आर रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालय विभागाद्वारे शाळेमध्ये विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शाळेतील मीडिया क्लब द्वारे विविध पोस्टरचे हस्तलिखित याचे प्रदर्शन मांडण्यात आले, तसेच पहिली ते दहावी या वर्गासाठी विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यात पहिली व दुसरी साठी पुस्तक वाचन यात प्रथम क्रमांक सानवी लोमटे व आहील चितकोटे, तिसरी व चौथीसाठी स्टोरी टेलिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक राजहंस थोरात, पाचवी, सहावी साठी निबंध स्पर्धा यात प्रथम क्रमांक रेवती रायते, सातवी, आठवीसाठी बुक रेव्ह्यू या स्पर्धेत प्रथम क्रमांक जानवी मुसांडे, नववी आणि दहावीसाठी भाषण स्पर्धा त प्रथम क्रमांक नीलकृष्ण राठी याचा आला. या घेण्यात आलेल्या स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन आज ग्रंथपालदिनी त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच बेस्ट रीडर अवॉर्ड शाळेतील शिक्षिका स्वरांजली देशपांडे व श्रीदेवी नाडे यांना देण्यात आला. याप्रसंगी मार्गदर्शनपर भाषणांमध्ये प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलु यांनी विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील पुस्तकाचा आस्वाद घ्यावा तसेच ग्रंथालयातील वेगवेगळे पुस्तक वाचन करावे. आजच्या डिजिटल युगात वाचनापासून प्रत्येक व्यक्ती दूर जात आहे मोबाईल टीव्ही यापेक्षा वाचन केल्यानेच आपला सर्वांगीण विकास होतो असे मत व्यक्त केले. तसेच दरवर्षी ग्रंथालयामध्ये नवनवीन ग्रंथ संग्रह उपलब्ध होतात त्यापर्यंत विद्यार्थी पोहोचणे व वाचन करणे खूप महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन मार्गदर्शनपर भाषणात सरांनी सांगितले.

# रायगडमध्ये आई संघटनेचे भव्य वादळ – अर्धवेळ श्री परिचारिका महिलांच्या न्यायहक्कासाठी ठरला बालेकिल्ला



**निलंगा/माधव माने:** बहुजन क्रांती सेना आणि आई संघटनेच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यात आयोजित भव्य मीटिंगला जिल्हाभरातून पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मैदान महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी गजबजून गेले, जोरदार घोषणांनी परिसर दणाणून गेला आणि रायगड जिल्हा आई संघटनेच्या बालेकिल्ल्याप्रमाणे गाजला.

या सभेसाठी महाराष्ट्र राज्य अध्यक्षा वंदनाताई संसारे, राज्य उपाध्यक्षा संगीता ताई कडाळे, राज्य सचिव विनोद भाऊ भोसले, राज्य कार्याध्यक्ष माधव माने सर, लातूर जिल्हा कार्याध्यक्ष (महिला) कविता निरभवणे, शहरी जिल्हाध्यक्ष मंगलताई सोनकांबळे, लातूर जिल्हाध्यक्ष मनीषाताई माने, व्यंकटजी शहवारे यांच्यासह रायगड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेत ज्योतीताई मते यांची रायगड जिल्हा अध्यक्षा म्हणून नियुक्ती, तर नंदाताई धनावटे यांची रायगड जिल्हा राज्य सदस्य म्हणून निवड जाहीर करण्यात आली. या निवडींचा कार्यकर्त्यांनी टाळ्यांच्या गजरात आणि आनंदाश्रूंनी स्वागत केले.

या ऐतिहासिक मीटिंगला संघटनेचे सल्लागार बाजीरावजी घाटे सर आणि जळगाव जिल्हा अध्यक्षा सुवर्णाताई पाठक यांचीही मान्यवर उपस्थिती लाभली.

अर्धवेळ श्री परिचारिका महिलांच्या पगारवाढी, न्याय व सन्मानासाठी लढा उभारण्याचा संकल्प या सभेत करण्यात आला. हा लढा रायगडच्या प्रत्येक कोपऱ्यात पोहोचवण्याचे ठरवण्यात आले.

रायगड जिल्हा आज केवळ नावापुरता नाही, तर खऱ्या अर्थाने आई संघटनेचा नंबर १ बालेकिल्ला म्हणून ओळखला जात आहे. अन्यायाविरुद्ध व हक्कांसाठी रायगडमधून उठलेले हे वादळ आता संपूर्ण महाराष्ट्रात घुमणार आहे.

# दत्तात्रय गणपतराव परळकर यांना शिवरत्न पत्रकारिता पुरस्कार जाहिर

## प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत १९ ऑगस्ट रोजी होणार भव्य सोहळा

**लातूर/प्रतिनिधी:** पत्रकारितेच्या प्रामाणिक वाटचालीला, व्यावसायिक क्षेत्रातील सकारात्मक योगदानाला आणि समाजहितासाठी केलेल्या उपक्रमांना सलाम म्हणून, लातूर मिशन वृत्तपत्राच्या वतीने दिला जाणारा शिवरत्न पत्रकारिता पुरस्कार यंदा समृध्द व्यापारचे संपादक दत्तात्रय गणपतराव परळकर यांना जाहीर झाला आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून समृध्द व्यापार या वृत्तपत्राच्या माध्यमातून परळकर यांनी वाचकांपर्यंत सत्य, रचनात्मक आणि प्रेरणादायी माहिती पोहोचवण्याचे सातत्याने कार्य केले आहे. स्थानिक तसेच महाराष्ट्रातील व्यापारी वर्गाशी जपलेले विश्वासाचे नाते, वस्तुनिष्ठ वृत्तांकन आणि समाजोपयोगी उपक्रम यांच्या आधारेच हा पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती लातूर मिशनचे संपादक भारत जाधव यांनी दिली.

शिवरत्न पुरस्कार सोहळा १९ ऑगस्ट २०२५ रोजी भव्य दिमाखात पार पडणार आहे. या वेळी पत्रकारिता, सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

पुरस्कार जाहीर होताच समृध्द व्यापारच्या संपादक मंडळात आणि वाचकवर्गात आनंदाची लाट पसरली आहे. शुभेच्छुकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, हा सन्मान वाचकांच्या विश्वासाचे आणि पत्रकारितेतील सचोटिचे प्रतिक असल्याचे परळकर यांनी सांगितले.

तसेच त्यांनी लातूर मिशनचे संपादक भारत जाधव व पुरस्कार निवड समितीचे मनःपूर्वक आभार मानले व या कार्यक्रमास सहभागी होण्याचे आवाहनही केले आहे

# गाथा कर्तृत्वाची...

त्याग आणि समर्पणाची पायाभरणी असेल तरच संस्था यशस्वी वाटचाल करते;असा भाव असणारी अनेक कृतिवंत व्यक्तिमत्त्व संस्थेत असतात म्हणूनच संस्था फुलते, बहरते नि यशाकडे झेप घेते त्यांपैकीच एक कृतिवंत व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे माजी सचिव आदरणीय श्री. श्यामसुंदरजी श्रीनिवासजी भार्गव.

श्यामसुंदरजी भार्गव यांचा जन्म इ.स. १९५० मध्ये लातूर या ठिकाणी झाला. व्यापारी क्षेत्रात कार्यरत असूनही शिक्षणाविषयी त्यांना प्रचंड आस्था! त्यामुळेच लातूरमधील उदात्त शैक्षणिक वारसा असलेल्या श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे त्यांनी सदस्यत्व स्वीकारले.

इ. स. २००२ मध्ये श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालयाच्या शालेय समिती अध्यक्षपदी त्यांची नियुक्ती झाली. शालेय समिती अध्यक्ष म्हणजे संस्था आणि शाळेतील शिक्षक, कर्मचारी यांना जोडणारा महत्त्वपूर्ण दुवा! हा दुवा जितका शिस्तप्रिय, कणखर आणि भेदभाव न करणारा तितक्याच झपाट्याने शाळा प्रगतीच्या दिशेने वाटचाल करते. प्रचंड शिस्तीने आणि ताकदीने भार्गवजींनी शालेय समिती अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. शाळेच्या शिस्तीकडे त्यांनी बारकाईने लक्ष दिले. संस्थेला सेवा देताना दर्जात्मक समयदान महत्त्वाचे असते हे त्यांच्या कामामधूनच आम्हां शिक्षिकांना समजत गेले.

वक्तशीरपणा,शिस्त आणि कामातील नीटनेटकेपणा ही जणू त्यांच्या कामाची त्रिसूत्रीच ! माझ्या शाळेत काम करणारी प्रत्येक शिक्षिका कर्तव्यामध्ये परिपूर्ण असली पाहिजे असा त्यांचा नेहमी आग्रह असे ; तथापि हे पवित्र कार्य पेलताना सर्व शिक्षकांप्रति त्यांच्या मनात समभाव होता आणि तोच भाव त्यांच्या वर्तनात नि कृतीत दिसत असे.अशा पितृतुल्य व्यक्तिमत्त्वामुळे आपोआपच विद्यार्थिनींसमवेत आम्ही शिक्षिकाही घडत गेलो.

शाळेतील विद्यार्थिनींना शिस्त लागली पाहिजे, विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे, विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण व्हावी म्हणून त्यांनी शाळेतील विद्यार्थिनींसाठी 'व्यक्तिमत्त्व विकास व क्रीडा शिबिराची' सुरुवात केली. शिबिर घेताना आर्थिक अडचण दिसताक्षणीच त्यांनी मदतीचा हात पुढे केला. शाळेच्या सर्व माजी विद्यार्थिनींविषयीही त्यांना तितकीच आस्था होती. या आस्थेपोटीच इ. स. २००६ मध्ये शाळेच्या हीरक महोत्सवानिमित्त त्यांनी माजी विद्यार्थिनींच्या भव्य मेळाव्याचे आयोजन केले.

इ.स. २००७ मध्ये श्री. श्यामसुंदरजी भार्गव श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे सचिव झाले. आम्ही प्रेमयुक्त आदराने त्यांना भाऊ या नावाने संबोधत असायचो.

भाऊ जेव्हा शाळेत यायचे तेव्हा मुलींची आस्थेने चौकशी करायचे. काही मुलींच्या घरची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे त्यांच्या शिक्षणात अडचण येत आहे, ही बाब भाऊंच्या लक्षात आली. मुलींच्या शिक्षणाप्रति कोमल हृदय, कनवाळू वृत्ती असणाऱ्या भाऊंनी इ.स. २०१६ मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील दोन विद्यार्थिनींना शैक्षणिक दत्तक घेतले आणि त्यातूनच पुढे त्यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थिनींसाठी 'गोदावरीच्या लेकी ' व केशरबाईच्या लेकी या योजना सुरू केल्या. कोणतीही योजना सुरू करणे हे खूप सोपे ;तथापि ती योजना राबवणे, त्याचे काम सातत्याने चालू राहणे हे काम अतिशय अवघड असते . कितीही बिकट परिस्थिती असली तरी मुलगी शिकली पाहिजे या ध्यासापोटी सुरू केलेल्या योजनेचे काम त्यांनी तन-मन-धनाने पाहिले. ते नेहमी म्हणायचे की, श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे संस्थापक आदरणीय सेठ पूरणमलजींनी स्थापन केलेल्या या पावनभूमीलाच दातृत्वाचा वसा लाभलेला आहे ; त्यामुळेच येथे काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला दातृत्वाचा संस्कार आपोआपच मिळतो.



'गोदावरीच्या लेकी योजना ' म्हणजे अनेक दातृत्वाचे हात ! दानदात्यांनी दिलेल्या ठेवीविषयी आदराने सांगताना भाऊंचे मन कृतज्ञतेने भरून यायचे . दानदात्यांनी ठेव स्वरूपात ठेवलेल्या ठेवीमुळेच आपण आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींचा शिक्षणाचा भार उचलत आहोत असा कृतज्ञता भाव त्यांच्या मनामध्ये कायम होता. गोदावरी शाळा आणि गोदावरीच्या लेकी योजना हे जणू त्यांचे अस्तित्व ! म्हणूनच अगदी शेवटच्या श्वासापर्यंत केवळ आणि केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी 'गोदावरीच्या लेकी' योजनेचे काम खंबीरपणे पाहिले. इतकेच नव्हे तर समाजऋणाची जाण ठेवून त्यांनी 'विवेकानंद कॅन्सर हॉस्पिटलला 'आणि इतर शैक्षणिक संस्थानाही भरभरून देणगी दिली.

करून जावे असेही काही, दुनियेतून या जातानागहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवटचा देताना, स्वर कठोर त्या काळाचाही, क्षणभर व्हावा कातर -कातर

कवी विंदाच्या या ओळी म्हणजे आदरणीय भार्गवजींचे कार्य आणि त्यांचे कार्यरूपी अमरत्व !

आदरणीय भार्गवजींनी सुरू केलेल्या योजनेच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थिनींचे शिक्षण आजही अखंडपणे चालू आहे . म्हणूनच या चिमण्या मुलींच्या पंखामध्ये बळ येऊ दे .स्वतःचं शिक्षणाचं स्वप्न पूर्ण करण्याची जिद्द त्यांच्या मनामध्ये निर्माण होऊ दे. हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

आजचा दिवस म्हणजे आदरणीय श्यामसुंदरजी भार्गव यांचा प्रथम पुण्यस्मरण दिन ! गोदावरीच्या सर्व लेकींनी शिकावं , मोठं व्हावं आणि समाजातील इतर लेकींसाठी प्रेरणादायी ठरावं हीच आजच्या दिनी त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**शब्दांकन**
**सौ.काशीबाई नारायण मुंढे**
**सहशिक्षिका,**
**श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालय, लातूर**

# हनी ट्रॅपपासून वेळीच सावध व्हा!


आजकाल आपण हनी ट्रॅपबद्दलच्या बातम्या, घटना त्यातून वाढत चाललेली गुन्हेगारी वृत्ती, बदनामीच्या भीतीने घडणाऱ्या आत्महत्या याबद्दल रोज ऐकतो, वाचतो. या लेखात आपण हनी ट्रॅपबद्दल सविस्तर माहिती घेणार आहोत. हनी ट्रॅप म्हणजे एखाद्या आकर्षक किंवा मोहक व्यक्तीचा वापर करून दुसऱ्या व्यक्तीला जाळ्यात अडकवणं, शक्यतो अडकवणारी व्यक्ती ही महिला असते. हा ज्याला अडकवायचं त्याच्यासाठी एक प्रकारचा मानसिक आणि भावनिक सापळा आहे. यात खोटं प्रेम, आकर्षण, जवळीक, आपुलकी किंवा शारीरिक संबंधांचे आमिष दाखवून समोरच्या व्यक्तीकडून पैसे, मालमत्ता, गोपनीय माहिती किंवा इतर वैयक्तिक फायद्याच्या गोष्टी मिळवल्या जातात.

पूर्वी गुप्तहेर संस्थांकडून गुप्त माहिती मिळवण्यासाठी याचा वापर केला जायचा. सोशल मीडियाच्या युगात याचे स्वरूप बदलले आहे आणि आता सर्वसामान्य व्यक्तीही यात अडकू शकतात. हनी ट्रॅप वेगवेगळ्या कारणांसाठी केला जातो, त्यापैकी काही प्रमुख कारणे म्हणजे ब्लॅकमेलिंग, समोरच्या व्यक्तीला त्यांच्या खासगी क्षणांचे, फोटो किंवा व्हिडीओ मिळवून अथवा तो सोबत असताना शारीरिक संबंध करतानाचे फोटो, व्हिडीओ काढून त्यालाच नंतर ब्लॅकमेल करणे, त्याला व्हिडीओ कॉलमार्फत नको त्या गोष्टी करायला सांगून त्याचे रेकॉर्डिंग करून घेणे आणि नंतर त्याला त्रास देणे असे विविध प्रकार हनी ट्रॅप करणारी व्यक्ती वापरत असते. आर्थिक फायदा हा यातील महत्त्वाचा भाग आहे. मोठ्या पद-ावर असलेल्या व्यक्तींकडून पैसे, मालमत्ता किंवा इतर आर्थिक फायदे मिळवण्यासाठी हनी ट्रॅपचा वापर केला जातो. एकदा समोरचा ब्लॅकमेलिंग, सामाजिक बदनामी, नोकरी व्यवसायाच्या ठिकाणी हे समजलं तर नोकरी जाईल, व्यवसायावर परिणाम होईल, समाजात बाहेर कुठे हे फोटो व्हिडीओ व्हायरल झाले तर काय होईल याला घाबरून जातो. अशा तणावात्मक परिस्थितीत असलेल्या व्यक्तीला वारंवार धाक दाखवून मोठ्या रकमेची मागणी केली जाते. एखाद्या व्यक्तीकडून गुप्त माहिती मिळवण्यासाठी जसे की सरकारी अधिकारी, शास्त्रज्ञ किंवा उच्च पदावरील व्यक्तींकडून देशाच्या सुरक्षेशी संबंधित किंवा इतर गोपनीय माहिती मिळवणे, कार्यालयीन माहिती, राजकीय डावपेच, मोठे व्यवहार, महत्त्वाचे निर्णय याबद्दल माहिती काढणे हनी ट्रॅपद्वारे सहज शक्य होते.

राजकीय हेतू हनी ट्रॅपमध्ये अनेकदा पाहायला मिळतो. राजकीय विरोधकांना बदनाम करणे किंवा त्यांच्याकडून चुकीचे निर्णय घ्यायला लावून राजकीय फायदा मिळवणे, महत्त्वाचा राजकीय निर्णय अथवा घडामोडीमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी, राजकीय भूमिका बदलण्यासाठी, नेते अथवा पक्ष फोडीसाठी सुद्धा हनी ट्रॅप वापर-ला जातो. राजकीय पद मिळवणे, राजकारणात पुढे जाणे, उच्चपदस्त नेते मंडळीशी जवळीक साधणे, त्यांच्याकडून कामे करून घेणे यासाठी हनी ट्रॅपचा वापर केला जातो. आपल्या कामाचे क्षेत्र कोणतेही असो आपण हनी ट्रॅपमध्ये अडकणार नाही. यासाठी प्रत्येकाने सतर्क राहणे आवश्यक आहे. अगदी तरुण मुलं-मुली, वयोवृद्ध सुद्धा अशा सापळ्यात अडकत असतात. त्यामुळे आपलं वय कितीही असले तरी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. हनी ट्रॅपमध्ये पुरुष कसे अडकतात यावर अभ्यास केला असता काही मुद्दे प्रकर्षाने लक्षात येतात. मुख्य म्हणजे आजकाल प्रत्येकजण समाज माध्यमातून, मोबाईल, लॅपटॉपवरून विविध ॲप्लिकेशन, साईट्स हे नियमित वापरत असतात, अनेक नोटिफिकेशन आपल्याला येत असतात, अनेकदा विविध मेसेज, लिंक्स तपासून न घेता त्या उघडून पाहण्याची इच्छा होईल अशा प्रकारे तयार केलेल्या असतात. अशाच वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरून सोशल मीडियावर पुरुषांशी ओळख करून ती वाढवली जाते. फेसबुक, इन्स्टाग्राम, डेटिंग एप्स किंवा इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आकर्षक प्रोफाइलच्या माध्यमातून ओळख केली जाते. जवळीक झाल्यावर, समोरील व्यक्तीने आपला विश्वास संपादन केला आहे. हे लक्षात आल्यावर या सोशल मीडियावरील एकमेकांशी केलेल्या चॅटिंगचा, शेअर केलेले फोटो, व्हिडीओ आणि माहितीचा वापर करून समोरील व्यक्तीवर दबाव आणला जातो. जेव्हा कोणत्याही पुरुषाने भावनेच्या भरात काही आक्षेप हाय चॅटिंग केलेले असेल, मागणी केली असेल त्याला सावज बनवले जाते.

भावनिक नातं तयार करून ही व्यक्ती हळूहळू तुमच्याशी गोड बोलून जवळचं नातं निर्माण करते आणि तुमचा विश्वास जिंकते. त्यानंतर खासगी माहितीची देवाणघेवाण सुरू होते. जसे की समोरील व्यक्ती तुमच्याकडून तुमच्या खासगी आयुष्याबद्दलची माहिती घेते. तुमचे वीकपॉइंट, सुखं, दुःखं, सवयी ओळखून तुमच्याशी अधिक जवळीक साधण्याचा प्रयत्न करते. अगदी आपल्या कुटुंबाबद्दल, घर, नोकरी, उद्योग दैनंदिन रुटीन याबद्दल पण माहिती काढून घेतली जाते. अत्यंत संवेदनशील मुद्दा हनी ट्रॅपमध्ये अडकण्यासाठी कारणीभूत ठरतो. अनेकदा एखादी व्यक्ती व्हिडीओ कॉलवर अश्लील संभाषण किंवा कृती करण्याची मागणी करते. या क्षणांचे रेकॉर्डिंग करून ठेवले जाते त्यानंतर ब्लॅकमेलिंग सुरू होते. तुमच्याकडून पैशाची मागणी केली जाते किंवा काही गोपनीय महत्त्वाची माहिती द्यायला सांगितले जाते अथवा कोणतेही कामं जे जोखमीचे असेल ते तुमच्याकडून जबरदस्तीने करून घेतले जाते. हनी ट्रॅपपासून वाचण्यासाठी काय करावे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. या सापळयात अडकण्यापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी तुम्ही काही गोष्टी करू शकता. सामाजिक माध्यम वापरताना अनोळखी व्यक्तींशी सावधगिरी बाळगा. सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारताना सतर्क राहा, कोणतीही खोटी प्रोफाइल, खोटी माहिती खोटा फोटो टाकून बनवली आहे की खरंच अशी व्यक्ती अस्तित्वात आहे, कुठे आहे, काय करते याचा शहानिशा करा. कुठल्याही अस्तित्वात नसलेल्या, संबंध नसलेल्या सुंदर मुलींचे, महिलांचे इंटरनेटवरून फोटो वापरून, त्याला खोटं नावं वापरून विविध ॲप्लिकेशनवर टाकलेले असतात. त्या प्रोफाइलला हात-ाळणारे भलतेच लोकं असतात जे तुम्हाला हनी ट्रॅप करण्यासाठी अनेक प्रकारे प्रयत्न करत असतात. त्यामुळे कितीही मोह झाला, आकर्षण वाटले तरी आपली सदसदविवेकबुद्धी जागृत ठेऊनच सोशल मीडिया हाताळणे उचित आहे. कोणालाही आपली वैयक्तिक माहिती देऊ नका, कोणत्याही अनोळखी व्यक्तीसोबत तुमच्या खासगी आयुष्याबद्दल, आर्थिक परिस्थितीबद्दलची माहिती शेअर करू नका. अनोळखी व्यक्तींसोबत व्हिडीओ कॉलवर खासगी किंवा अश्लील संभाषण टाळा. अशा परिस्थितीत कोणतीही आक्षेपार्ह गोष्ट करू नका, पैशाची मागणी करणाऱ्यांपासून दूर राहा. जर कोणी तुमच्याकडे अचानक पैसे किंवा इतर मदतीची मागणी करत असेल, त्याचा हेतू योग्य वाटतं नसेल, तर लगेच सावध व्हा. अशा प्रकरणात पोलिसांची मदत घेणे अत्यंत आवश्यक आहे. जर तुम्हाला कोणी ब्लॅकमेल करत असेल तर घाबरू नका. लगेच पोलिसांना याची माहिती द्या, कायद्याची मदत घ्या. जर तुम्हाला हनी ट्रॅपच्या कोणत्याही परिस्थितीत अडकल्याचा संशय आल्यास, कारवाई करण्यासाठी कुटुंबातील सदस्य, मित्र, नातेवाईक यांची मदत घ्या, त्यांना विश्वासात घ्या, स्वतःची चूक मान्य करा, घाबरून, गडबडीत चुकीचा निर्णय घेणे टाळा. अशावेळी तुम्ही पोलिसांना किंवा सायबर सेलला संपर्क करू शकता.

– मीनाक्षी जगदाळे



होमवर्कः बालमित्रांना हे चित्र तुमच्या आवडीचे रंग भरुण व्यवस्थित कलर देवून रंगवा

# ओठांच्या आजूबाजूला काळसर डाग असल्यास

अनेक व्यक्तींच्या ोठांच्या आसपास काळसर डाग दिसून येतात. त्यामुळे बाकी चेहऱ्याच्या मानाने त्यांचे ओठ खूपच काळसर दिसतात. त्यामुळे चेहरा देखील अनाकर्षक दिसू लागतो. क्वचित प्रसंगी ओठांच्या किनाऱ्यावर काळसर रेष दिसू लागते. ओठांच्या किनाऱ्यावर किंवा ओठांवर जर काळसर डाग दिसू लागले, तर शरीरामध्ये जीवनसत्वांची कमी असू शकते हे ओळखावे. एखाद्या सौंदर्यप्रसाधनाची ॲलर्जी आल्याने देखील ओठांवर काळसर डाग दिसून येऊ शकतात. हा काळसरपणा दूर करण्यसाठी काही गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे.काही व्यक्तींना सतत ओठांवरून जीभ फिरविण्याची सवय असते. यामुळे ओठांच्या त्वचेवर इन्फेक्शन होण्याची शक्यता असते. अश्या प्रकारचे इन्फेक्शन झाल्यास ओठांवर काळसर डाग पडू शकतात. अश्या वेळी ओठांवर वारंवार जीभ फिरविण्याची सवय कमी करण्याचा प्रयत्न करायला हवा. ओठांना आणि ओठांच्या आसपासच्या त्वचेला एखाद्या चांगल्या प्रकारच्या सौम्य एक्सफोलीयेटर स्क्रब चा वापर करून स्क्रब करावे.ओठांच्या आसपासची त्वचा आणि ओठ वारंवार कोरडे पडत असतील तर त्यांवर काळसर डाग येण्याचा संभव असतो. हे टाळण्यासाठी ओठांच्या आसपासच्या त्वचेला व ओठांना वारंवार मॉईश्चराइज करीत राहावे. तसेच बाजारामध्ये अनेक उत्तम ब्रँडची स्कीन लाईटनिंग क्रीम्स उपलब्ध आहेत. डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे योग्य लाईटनिंग क्रीम निवडावे. या क्रीमच्या वापरामुळे ओठांच्या आसपासचे डाग कमी होण्यास मदत होईल. उन्हामुळे देखील ओठांच्या आसपास काळसर डाग उत्पन्न होतात. त्यामुळे दररोज उत्तम प्रतीच्या सनस्क्रीनचा वापर करावा. शरीरामध्ये जीवनसत्वे कमी असल्यास ही अश्या प्रकारचे काळसर डाग पडू शकतात. त्यामुळे आपल्या आहारामध्ये जीवनसत्वे भरपूर प्रमाणात असलेले अन्नपदार्थ समाविष्ट करावेत. जर आवश्यकता जाणविली तर डॉक्टरांच्या सल्ल्याने सप्लीमेंट्स ही घ्याव्यात. जर काळसर डाग खूप मोठ्या प्रमाणावर असतील तर केमिकल पील्सचा वापर करता येईल, मात्र ही प्रक्रिया तज्ञांकडूनच करवून घ्यावी.



खासगी क्षेत्रातील ॲक्सिस बँक आणि एचडीएफसी बँकेने आपल्या ग्राहकांना याबद्दल माहिती देण्यास सुरुवात केली आहे.- ढच् मधून पैसे काढण्यासाठी द्यावे लागणार जास्त पैसे रिझर्व बँकेच्या नव्या नियमांनुसार आता एटीएमधून विनाशुल्क पैसे काढण्यावर मर्यादा आल्या आहेत. ग्राहकांनी जर आता -ढच् व्यवहाराची मर्यादा ओलांडली तर त्यांना १ जानेवारी २०२२ पासून अधिकचे पैसे द्यावे लागणार आहेत. कारण भारतीय रिझर्व्ह बँक (ठइख) ने प्रत्येक सार्वजनिक आणि खासगी बँकेसाठी पैसे काढण्यावर शुल्क वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. जून २०२१ च्या आदेशाप्रमाणे, १ जानेवारी २०२२ पासून लोकांनी विनामूल्य व्यवहाराची मर्यादा ओलांडल्यानंतर बँकांना एटीएम व्यवहारांवर प्रति व्यवहार २१ रुपये आकारण्याची परव-ानगी दिली आहे. याशिवाय ग्राहकांना त्यावर जीएसटीही भरावा लागणार आहे. या नव्या नियमांमुळे एटीएममधून पैसे काढणं किंवा इतर कोणतेही व्यवहार करणं आता महागणार आहे. दरम्यान, ग्राहकांना त्यांच्या स्वतःच्या बँकेच्या एटीएममधून महिन्यातून पाच वेळा विनामूल्य पैसे काढता येणार आहेत. पाचपेक्षा जास्त वेळा पैसे काढले तर ग्राहकांना अधिकचे पैसे द्यावे लागणार आहेत. तर इतर बँकांच्या एटीएममधून तीन वेळा विनामूल्य व्यवहार करू शकता. इतर एटीएमधून तीनपेक्षा जास्त वेळ पैसे काढले तर त्यांनी अधिकचे पैसे द्यावे लागणार आहेत.

रिझर्व्ह बँकेने एका निवेदनात म्हटले आहे की, बँकांना उच्च विनिमय शुल्काची भरपाई करण्यासाठी आणि खर्चात सामान्य वाढ लक्षात घेता, त्यांना ग्राहक शुल्क प्रति व्यवहार २१ रुपये करण्याची परवानगी आहे. आरबीआयच्या मंजुरीनंतर खासगी क्षेत्रातील ॲक्सिस बँक आणि



## व्यवहार करण्याआधी हे नियम जाणून घ्यायला विसरू नका!

एचडीएफसी बँकेने आपल्या ग्राहकांना माहिती देण्यास सुरुवात केली आहे. यासंदर्भातील माहिती ग्राहकांना एसएमएसद्वारे पाठवली जात आहे. एसएमएसमध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की, ॲक्सिस बँक, एचडीएफसी बँक किंवा इतर बँकेच्या एटीएममधून मोफत मर्यादेनंतर केलेल्या व्यवहारावर २१ रुपये शुल्क आणि जीएसटी भरावा लागणार आहे.

यासाठी आधी २० रुपये आकारले जात होते. परंतु, आता या रकमेत वाढ करण्यात आली असून आता २१ रुपये आकरण्यात येणार आहेत. मेट्रो शहरात राहणाऱ्या ग्राहकांसाठीच्या नियमातही बदल करण्यात आले आहेत. बंगळुरू, मुंबई, चेन्नई, दिल्ली, कोलकाता आणि हैद्राबाद शहरातील एचडीएफसी बँकेच्या ग्राहकांना आणि ॲक्सिस बँकेच्या ग्राहकांना एटीएममधून तीन वेळा निशुल्क पैसे काढता येणार आहेत.

## डॉक्टर टीप्स

**वैवाहिक जीवनाच्या सुखाचा उपभोग घेत असताना होणारे फायदे जाणून घ्या**

८) हार्ट अटॅक कमी करतो सेक्सचा धोका



सेक्स तुमच्या हृदयासाठीही फारच उपयोगी आहे. सेक्स करत राहत असतांना हार्ट अटॅकचा धोका कमी होतो, नियमित सेक्स हार्ट अटॅक आणि स्ट्रोकती शक्यता निम्याने कमी होते. सेक्स करत राहिल्याने एस्ट्रोजन आणि टेस्टोस्टेरॉन संतुलित राहतं. जाणकारांच्या मते एका आठवड्यात दोन वेळा सेक्स केल्याने हार्ट अटॅकची शक्यता निम्याने कमी होते.९) दुखणी गायब करतो सेक्स सेक्स शरीराची अनेक दुखणी कमी करतो, सेक्स एक्सपर्टच्या मते एस्पिरिनची गोळी घेण्यापेक्षा सेक्स जास्त लाभदायक आहे. यामुळे शरीरातील दुखणी कमी करण्यासाठी सेक्स गोळ्यांपेक्षाही जास्त लाभदायक मानला जातो.

## विनोद




प्रियकर प्रेयसी बागेत बोलत बसले होते. प्रेयसी म्हणाली, प्रेम, माझ्या मम्मीला ना तू खूप खूप आवडतोस.
प्रेम घाबरून म्हणाला.
पण..पण मी लग्न तुझ्याशीच करणार हं.

## संदेश

Arz he..
Hum bhi dost tere lie TAJ MAHAL banaaenge..
Gaur farmaaiga...
Hum bhi dost tere lie TAJ MAHAL banaaenge..
Ek cup shubah .. or ek cup shaam ko pilaenge.

## सुविचार



श्रद्धा ही सामर्थ्यवान असते. कशावर तरी श्रद्धा ठेवल्याशिवाय माणूस जिवंत राहू शकत नाही.

**संस्कृत सुभाषित**

**आयु: वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।**
**रस्या: स्निग्धा: स्थिरा हृद्या आहारा:**
**सात्विकप्रिया : ।।**

**अर्थ** – जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार सात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

## आडवे शब्द

१. ब्लडप्रेशरला मराठी शब्द
४. आपला-परका असा भेद (भाव)
७. श्वापद, पशू
११. भ्रमंती
१३. डवरणे, भरून येणे
१४. फणसाचा एक प्रकार
१६. पादत्राण
१७. देशी दारू
१८. पूर्णपणे
१९. यांच्यासारखे सख्य म्हणजे पूर्ण वैरच की!
२२अ. पेशव्यांची राजधानी
२४. खंदक
२५. खुंटी, मेख
२६. सत्य
२९. आजूबाजूला
३०. सांघिक व्यायाम
३२. अनुमती
३४. घोडा
३५. स्वत:च्या नावे कालगणना सुरू करणारा राजा
३७. रोम
३९. कवी बा.भ. बोरकर यांची नादमधुर कविता- 'गडद निळे, गडद निळे --- भरूनि आले'
४१. गुडघ्याखाली येणारा हार
४४. दारूच्या आहारी गेलेला
४६. समाधान पावलेला
४७. दूध वा दूधाचे पदार्थ
४८. थडगे
५०. गुणज्ञ
५२. खवा
५३. बडबड्या
५५. माळ, हार
५७. देह
५९. मज्जाव
६०. पातळ खांब
६२. कपाळभर लावलेले कुंकू
६३. वागणूक
६४. वाईटाचे मंत्रतंत्र
६६. क्षमता, ताकद
६७. धमनी
६९. लक्ष्मी
७१. संताप
७३. बागवान
७४. बासरी
७६. गणपती
७७. किरकोळ सामान

## उभे शब्द

१. चैत्रवमीचा अवतार
२. मोठी जाड सुई
३. लट, परंतु (इंग्रजी)
४. आमिरचे बंबईय्या भाषेतील पर्यटनगीत!-'-- क्या खंडाला?
५. प्रचीती, अनुभव
६. बासुंदीपेक्षा हल्ली ही लोकप्रिय
७. स्त्रियांसाठी पूर्वी वापरले जाणारे विशेषण
८. धातूचे चलन
९. झाडाच्या चिकापासून मिळणारा चिवट पदार्थ
१०. अळूच्या भाजीत ही पालेभाजी हवीच!
१२. उबग, सुस्ती
१५. उपवासाचा कंद
१८. ही उपाधी मिरवण्यासाठी पुण्यात केवळ वास्तव्य असणे पुरेसे नाही!
१९. विकासपथावर असलेला
२०. नको त्या गोष्टीत नाक खुपसणारी
२१. कालच्या आधीचा दिवस
२२. 'स्वामी'कार रणजित देसाईंच्या पत्नी माधवी देसाई यांचे आत्मकथन- '-- गं घुमा'
२३. गाईचे पिल्लू
२५. पाप
२७. तमाशातील प्रश्नोत्तरे
२८. ही टाकणे म्हणजे पड
२९. ध्वनी
३१. यश देणारे
३३. आश्चर्य
३६. रवाळ
३८. सतत तक्रार करणारा
४०. करूणा, कीव
४१. अंगमेहनत करून निर्वाह करणारा
४२. घराणे,४३. हस्त
४५. तात्पुरते रुसणे
४७. पणजीचे राज्य
४८. वेदनेची तिडीक
४९. जीभ, ५१. दार
५२. आत्या,५४. एक पालेभाजी
५६. श्रीमंत,५७. मंदवासर
५८. छोटा फोड, ५९. चितन
६१. उंट हाकणारा, ६२. मनाला आलेला थकवा,६५. भडीमार,६८. समतल
७०. तपास, शोध,७२. फक्त, केवळ
७३. चंद्राची कड
७५. घाव, प्रहार

## आडवे उत्तरे


१.रक्तदाब ४.आपपर ७.अनावर ११.भटकंती १३.डबडबणे १४.बरका १६.वहाण १७.ताडी १८.पुरता १९.विळाभोपळा २२अ.पुणे २४.चर २५.पाचर २६.कस २९.आसपास ३०.कवायत ३२.परवानगी ३४.वारू ३५.शककर्ता ३७.लव ३९.जलद ४१.कमालखानीहार ४४.दारूड्या ४६.तुष्ट ४७.गोरस ४८.कबर ५०.कदरदान ५२.मावा ५३.वाचाळ ५५.सर ५७.शरीर ५९.मनाई ६०.वासा ६२.मळवट ६३.वर्तन ६४.जारणमारण ६६.कुवत ६७.नस ६९.रमा ७१.राग ७२.माळी ७४.पावा ७६.गजानन ७७.सटरफटर

## उभे उत्तरे

१.रघुवर २.दाभण ३.बट ४.माती ५.पडताळा ६.रबडी ७.अबला ८.नाणे ९.रबर १०.चुका १२.कंटाळा १५.रताळे १८.पुणेकर १९.विकसनशील २०.भोचकभवानी २१.परवा २२.नाच २३.वासरु २५.पातक २७.सवालजबाब २८.नांगी २९.आवाज ३१.यशस्कर ३३.नवल ३६.कणीदार ३८.रड्या ४०.दया ४१.कष्टकरी ४२.खानदान ४३.हात ४५.रुसवा ४७.गोवा ४८.कळ ४९.रसना ५१.दरवाजा ५२.मावळण ५४.चाकवत ५६.रईस ५७.शनिवार ५८.पुटकुळी ५९.मनन ६१.सारवान ६२.मरगळ ६५.मारा ६८.सपाट ७०.माग ७२.मात्र ७३.कोर ७५.वार

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र. १





# क्रीडा विश्व



# पाकिस्तान ९२ धावांवर ऑलआऊट!





## वेस्ट इंडिजकडून वनडेमधील मोठा पराभव

## ३४ वर्षांनी पाक संघावर आली अशी वेळ

कराची: पाकिस्तान संघाचा वेस्ट इंडिजने मोठा दारूण पराभव केला आहे. मोहम्मद रिझवानच्या नेतृत्त्वाखाली संघाला सर्वात मोठ्या पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. पाकिस्तान संघाचा वेस्ट इंडिजने तिसऱ्या वनडे सामन्यात दारूण पराभव केला आहे. शे होपच्या नेतृत्त्वाखालील वेस्ट इंडिज संघाने पाकिस्तानचा तब्बल २०२ धावांनी पराभव केला, यासह वेस्ट इंडिजने २-१ ने तीन सामन्यांची वनडे मालिका आपल्या नावे केली आहे.३४ वर्षांनंतर वेस्ट इंडिजने पाकिस्तानविरुद्ध एकदिवसीय मालिका जिंकण्यात यश मिळवले. प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने शे होपच्या शतकाच्या जोरावर ६ गडी गमावून २९४ धावा केल्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संपूर्ण संघ ९२ धावांवर ऑलआउट झाला.

तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने ५० षटकांत ६ गडी गमावून २९४ धावा केल्या. मालिकेच्या निर्णायक सामन्यात वेस्ट इंडिजला इतक्या मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहोचवण्यात कर्णधार शे होपने मोठी भूमिका बजावली. त्याने उत्कृष्ट शतकी खेळी करत संघाचा डाव सावरला. शे होपने या सामन्यात १८वं वनडे शतक झळकावलं. शे होपने ९४ चेंडूत १० चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने नाबाद १२० धावा केल्या. कर्णधार होपच्या स्फोटक फलंदाजीमुळे, पहिल्या ४२ षटकांत ६ गडी बाद १८५ धावा करणाऱ्या वेस्ट इंडिज संघाने शेवटच्या ८ षटकांत एकही विकेट न गमावता १०९ धावा जोडल्या.एकट्या शे होपच्या १०० धावा अन् पाकिस्तान ९२ धावांवर ऑलआऊट

मालिकेच्या निर्णायक सामन्यात विजयासाठी पाकिस्तानसमोर २९५ धावांचे लक्ष्य होते. पण, वेस्ट इंडिजविरुद्ध धावांचा पाठलाग करण्यात पाकिस्तानचा डाव पत्त्यांसारखा कोसळला. पाकिस्तानच्या ३ फलंदाजांना भोपळाद-खील फोडता आला नाही. बाबर आझम ९ धावा करत बाद झाला. तर मोहम्मद रिझ-वानने चेंडू सोडला आणि तो बाद झाला. याशिवाय सलमान आघाने ३० धावांची सर्वात मोठी खेळी केली. अवघ्या ९२ धावांवर संपूर्ण पाकिस्तानचा संघ सर्वबाद झाला. परिणामी, वेस्ट इंडिजने २०२ धावांनी सामना जिंकला, जो धावांच्या बाबतीत पाकिस्तानवरील त्यांचा सर्वात मोठा विजय आहे. त्यांनी २०१५ मध्ये क्राइस्टचर्चमध्ये खेळल्या गेलेल्या एकदिवसीय सामन्यात १५० धावांनी विजय मिळवण्याचा विक्रम मोडला आहे.वेस्ट इंडिजने वनडे क्रिकेटमध्ये चौथ्यांदा २०० पेक्षा अधिक धावांनी एखाद्या संघावर विजय मिळवला आहे. वेस्ट इंडिजचा गोलंदाज जेडन सील्सने भेदक गोलंदाजी करत पाकिस्तानचं कंबरडं मोडलं. सील्सने पाकिस्तानच्या निम्म्या संघाला माघारी धाडलं. त्याने ७.२ षटकांत १८ धावा देत ६ बळी घेतले, ही त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी आहे.



## ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वी रोहित शर्माचा माजी प्रशिक्षक अभिषेक नायर यांच्यासोबत सराव

मुंबई : भारतीय एकदिवसीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने माजी सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायर यांच्यासोबत सराव सत्रात भाग घेतला. हिटमॅनने त्याच्या सोशल मीडिया हँडलवरून हा फोटो शेअर केला. सप्टेंबरमध्ये होणाऱ्या आशिया कपनंतर भारतीय संघ ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार आहे. या काळात दोन्ही संघांमध्ये तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका आणि पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाईल. त्याआधी एकदिवसीय संघाचा कर्णधार रोहितने सराव सुरू केला आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी टी-२० आंतरराष्ट्रीय आणि कसोटी स्वरूपातून निवृत्ती घेतली आहे आणि आता या दोन्ही फलंदाजांच्या एकदिवसीय भविष्याबद्दल अनेक चर्चा भारतीय क्रिकेटमध्ये रंगत आहे. पण भारतीय क्रिकेट नियामक मंडळ या दोघांच्या बाबतीत कुठलाही निर्णय घेण्यापूर्वी घाई करण्याच्या मनस्थितीत नाही. भारतीय क्रिकेटमध्ये अशी चर्चा आहे की, ऑक्टोबर २०२७ मध्ये होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकापर्यंत रोहित ४० वर्षांचा असेल आणि कोहली ३९ वर्षांचा असेल. अशा परिस्थितीत, हे दोन्ही दिग्गज तोपर्यंत संघात टिकू शकतील का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. जर रोहित आणि कोहलीच्या मनात काही असेल तर ते इंग्लंडविरुद्धच्या कसोटी दौऱ्यापूर्वी जसे बीसीसीआयच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवले होते तसे ते आपल्या भविष्याबबात चर्चा करतील. भारतीय संघाच्या दृष्टिकोनातून पुढची मोठी स्पर्धा फेब्रुवारीमध्ये होणारा टी-२० विश्वचषक आणि त्यासंबंधीची तयारी आहे. सध्या आशिया कप टी-२० स्पर्धेसाठी सर्वोत्तम संघ पाठवण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

विराट कोहली आता लंडनमध्ये राहतो आणि अलीकडेच त्याने त्याच्या इंस्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आहे. ज्यामध्ये तो इनडोअर नेट सेशनमध्ये सराव करताना दिसला. यावरून असे दिसून येते की त्याने सराव सुरू केला आहे. रोहित शर्मा आयपीएलनंतर सुट्टीसाठी इंग्लंडमध्ये होता. पण आता तो मुंबईत परतला आहे आणि सराव सुरू केला आहे.

## आशिया चषकासाठी कसा असेल भारतीय संघ? 'या' खेळाडूंना मिळू शकते संधी

दिल्ली-आशिया चषक २०२५ स्पर्धेचा बिगुल वाजला आहे. येत्या सप्टेंबर महिन्यात या स्पर्धेला सुरूवात होणार आहे. सर्व संघांनी या स्पर्धेची तयारी देखील सुरू केली आहे. मात्र, भारतीय खेळाडू सध्या विश्रांती घेत आहे. येत्या काही दिवसात या स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा केली जाणार आहे. दरम्यान कोणाला संधी मिळणार? अशी चर्चा रंगायला सुरूवात झाली आहे. यावेळी भारतीय संघाची जबाबदारी सूर्यकुमार यादवकडे असणार आहे.

सूर्यकुमार यादवच्या हाती भारतीय संघाची जबाबदारी

रोहित शर्माने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम केलं आहे. रोहितने निवृत्ती जाहीर केल्यानंतर संघाची जबाबदारी सूर्यकुमार यादवकडे सोपवण्यात आली आहे. आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धा पाहता आशिया चषक स्पर्धा ही टी-२० फॉरमॅटध्ये खेळवली जाणार आहे. त्यामुळे सूर्यकुमार यादव भारतीय संघाचं नेतृत्व करताना दिसेल. यासह भारतीय संघासाठी आणखी एक आनंदाची बाब म्हणजे कसोटी संघाचा कर्णधार शुबमन गिल टी-२० संघात पुनरागमन करू शकतो. गेल्या काही महिन्यांपासून तो टी-२० संघातून बाहेर आहे. गिलच्या अनुपस्थितीत संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा डावाची सुरूवात करताना दिसून आले होते. काही दिवसांपूर्वीच अभिषेक शर्माने ट्रॅव्हिस हेडला मागे टाकत आयसीसी टी-२० फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी झेप घेतली आहे. त्यामुळे त्याला टी-२० संघातून बाहेर करण्याची शक्यता खूप कमी आहे. मात्र, गिल आल्यानंतर त्याच्या फलंदाजीक्रमात बदल होणार का? हे पाहणं देखील महत्वाचं ठरणार आहे.

आशिया चषक स्पर्धेसाठी या खेळाडूंची होऊ शकते एन्ट्री

आगामी आशिया चषक स्पर्धेत अभिषेक शर्मा, शुबमन गिलसह संजू सॅमसनलाही संघात स्थान मिळण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. त्याला यष्टीरक्षक फलंदाज म्हणून संघात स्थान दिलं जाऊ शकतं. तर ध्रुव जुरेल आणि जितेश शर्मा या दोघांपैकी एकाला संधी दिली जाऊ शकते. तर अष्टपैलू खेळाडू म्हणून हार्दिक पांड्या, तिलक वर्मा, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर,शिवम दुबे यांना संधी दिली जाऊ शकते.

गोलंदाजीक्रम मजबूत करण्यासाठी भारतीय संघात वरूण चक्रवर्ती, कुलदीप यादव, हर्षित राणा, अर्शदीप सिंग यांना संधी दिली जाऊ शकते. तर प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह देखील आशिया चषक स्पर्धा खेळताना दिसून येऊ शकतो. बुमराह टी-२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेनंतर एकही टी-२० सामना खेळताना दिसून आलेला नाही. आता आगामी टी-२० विश्वचषक पाहता बुमराह-ला संधी दिली जाणार का? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. मुख्य बाब म्हणजे, यशस्वी जैस्वाल आणि दुखापतीमुळे बाहेर असलेल्या ऋषभ पंत यांना या संघात स्थान मिळण्याची शक्यता कमी आहे.

या स्पर्धेसाठी असा असू शकतो भारतीय संघ:

सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुबमन गिल, संजू सॅमसन, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, शिवम दुबे, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, वरूण चक्रवर्ती, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, हर्षित राणा प्रसिध कृष्णा, जितेश शर्माध्रुव जुरेल.



## माजी क्रिकेटर सुरेश रैनाला ईडीचे समन्स

नवी दिल्ली: माजी भारतीय क्रिकेटपटू सुरेश रैना याला अंमलबजावणी संचालनालयाने (एऊ) चौकशीसाठी समन्स बजावले आहे. १इशीं या अवैध ऑनलाइन बेटिंग पशी संबंधित मनी लॉड्रिंग प्रकरणात त्यांची चौकशी केली जाणार आहे. ईडीकडून अनेक दिवसांपासून १इशीं आणि अशा इतर अनेक ऑनलाइन बेटिंग प्सच्या विरो-धात तपास सुरू आहे. हे प्स अवैध जुगार आणि मनी लॉड्रिंगमध्ये सामील असल्याचा ईडीला संशय आहे. या प्रकरणात अनेक सेलिब्रिटींची नावे समोर आली आहेत, ज्यांनी या प्सचे प्रमोशन केले होते.

सुरेश रैनाने १इशीं पचे 'रिस्पॉन्सिबल गेमिंग म्बेसेडर' म्हणून काम केले होते. याच कारणामुळे त्यांना ईडीने चौकशीसाठी बोलावले आहे. ईडी या प्रकरणात या पच्या जाहिरातीतून मिळवलेले पैसे आणि इतर आर्थिक व्यवहारांची चौकशी करणार आहे.

## बीसीसीआयने १४ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीला बंगळुरुला बोलावून घेतले, स्पेशल ट्रेनिंगला सुरुवात

मुंबई-वैभव सूर्यवंशीसाठी हे वर्ष अगदी स्वप्नवत ठरले आहे. आधी आयपीएलमध्ये १ कोटींपेक्षा जास्त किमतीत राजस्थान रॉयल्समध्ये निवड, त्यानंतर आयपीएलमधील ऐतिहासिक कामगिरी आणि त्याच्या जोरावर इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय अंडर-१९ संघात स्थान. आता बीसी-सीआय त्याला खास प्रशिक्षण देत आहे. मात्र, सध्या बोर्डाचे मुख्य लक्ष सप्टेंबरमध्ये होणाऱ्या आशिया कपवर आहे. वैभवला दिले जाणारे हे प्रशिक्षण भविष्यातील राष्ट्रीय संघासाठी त्याला घडवण्यासाठी आहे.

वैभव सूर्यवंशीसाठी हे प्रशिक्षण आशिया कपसाठी नसले तरी, वरिष्ठ खेळाडू हळूहळू निवृत्ती घेत असताना तरुण पिढीला तयार करण्याचा बोर्डाचा प्रयत्न आहे. त्यासाठी बीसीसीआयने वैभवला बंगळुरूमधील 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये विशेष प्रशिक्षणासाठी बोलावले आहे.

बंगळुरूमध्ये वैभव सूर्यवंशीचे विशेष प्रशिक्षण

१४ वर्षीय वैभवने आयपीएलच्या इतिहासातील




दुसऱ्या क्रमांकाचा जलद शतक झळकावले होते आणि तो भारतासाठी या लीगमध्ये सर्वात जलद शतक करणारा फलंदाज ठरला. त्यानंतर इंग्लंड दौऱ्यावरही त्याने उत्कृष्ट खेळ केला. इंग्लंडहून परतल्यानंतर राजस्थान रॉयल्सने त्याला विशेष सराव सत्रासाठी बोलावले होते. तिथूनच १० ऑगस्ट रोजी तो थेट 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये दाखल झाला. इथे त्याच्यासाठी सामन्यांच्या विशिष्ट परिस्थिती आणि तांत्रिक कौशल्यांचा विचार करून विशेष प्रशिक्षण योजना तयार करण्यात आली आहे.

कोच मनीष ओझा यांची प्रतिक्रिया

वैभवच्या बालपणीच्या प्रशिक्षक मनीष ओझा यांनी एका वेबसाईटशी बोलताना सांगितले की, ''बीसीसीआय पुढचा विचार करत आहे. वरिष्ठ खेळाडू निवृत्त होत आहेत आणि त्या जागा भरण्यासाठी पुढची तरुण फळी तयार करावी लागेल. वैभवचे प्रशिक्षण हा त्याच प्रक्रियेचा भाग आहे. आम्ही खेळाडूंना एकेक करून निवडतो आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या गरजेनुसार त्यांना तयार करतो.''

ते पुढे म्हणाले की, ''वैभवमध्ये पहिल्या चेंडूपासून आक्रमक खेळ करण्याची क्षमता आहे. आयपीएल, अंडर-१९ आणि विजय हजारे ट्रॉफीत त्याची ही झलक दिसली आहे. मात्र, कसोटीत त्याची कामगिरी थोडीशी कमी होते. आमचे लक्ष्य त्याला कसोटीतही तितकाच प्रभावी बनवणे आहे, म्हणजे दहा डावांपैकी सात-आठ डाव तरी प्रभावी हवेत.''

सप्टेंबरमध्ये ऑस्ट्रेलिया दौरा

भारतीय अंडर-१९ संघ सप्टेंबरमध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यात भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ३ युथ वनडे आणि २ युथ कसोटी सामने होतील. वैभवची या दौऱ्यासाठी संघात निवड झाली आहे.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारतीय अंडर-१९ संघ : आयुष म्हात्रे (कर्णधार), विहान मल्होत्रा (उपकर्णधार), वैभव सूर्यवंशी, वेदांत त्रिवेदी, राहुल कुमार, अभिज्ञान कुंडू (यष्टीरक्षक), हरवंश सिंग (विकेटकीपर), आर.एस. अंबरीश, कनिष्क चौहान, नमन पुष्पक, हेनिल पटेल, डी. दीपेश, किशन कुमार, अनमोलजीत सिंह, खिलान पटेल, उधव मोहन, अमन चौहान. राखीव खेळाडू - युद्धजीत गुहा, लक्ष्मण, बी.के. किशोर, अलंकृत रापोले, अर्नव बुग्गा.

## शुभमन गिलचा आणखी एक विक्रम; चौथ्यांदा ठरला आयसीसी प्लेअर ऑफ द मंथचा मानकरी

दिल्ली-भारताचा कसोटी कर्णधार शुभमन गिलला मंगळवारी (१२ ऑगस्ट) जुलै महिन्यासाठी आयसीसीचा महिन्यातील सर्वोत्तम पुरुष खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले. गिलने इंग्लंडमध्ये खेळल्या गेलेल्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील जुलैमध्ये झालेल्या तीन सामन्यांमध्ये ९४.५० च्या सरासरीने ५६७ धावा केल्या होत्या.याचबरोबर तो चौथ्यांदा आयसीसीचा महिन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार जिंकणारा पहिला पुरुष खेळाडू ठरला.

यापूर्वी, जानेवारी २०२३, सप्टेंबर २०२३ आणि फेब्रुवारी २०२५ मध्ये गिलला आयसीसीचा सर्वोत्तम खेळाडू म्हणून गौरवण्यात आले होते. महिला क्रिकेटमध्ये, ॲश गार्डनर आणि हेली मॅथ्यूज यांनी प्रत्येकी चार वेळा हा पुरस्कार जिंकला आहे.इंग्लंडविरुद्ध बर्मिंगहॅम येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात गिलने ४३० धावा केल्या होत्या. एकाच कसोटी सामन्यातील ही दुसरी सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या होती. त्या कसोटी सामन्यात त्याच्या २६९ आणि १६१ धावांच्या खेळींमुळे मालिका १-१ अशी बरोबरीत आली. मँचेस्टर येथे खेळल्या गेलेल्या चौथ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात त्याने १०३ धावांची उपयुक्त खेळी खेळून सामना अनिर्णित राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

गिल व्यतिरिक्त, इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स आणि दक्षिण आफ्रिकेचा अष्टपैलू खेळाडू वियान मुल्डर जुलैमध्ये महिन्याचा सर्वोत्तम खेळाडू होण्याच्या शर्यतीत होते.



## क्रीडा प्रशासनात पारदर्शकता येईल! पी.टी.उषाकडून क्रीडा विधेयकाचे स्वागत



नवी दिल्ली-भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या (आयओए) अध्यक्ष आणि राज्यसभा सदस्य असलेल्या पी. टी. उषा यांनी मंगळवारी क्रीडा विधेयकाचे स्वागत केले. क्रीडा विधेयकामुळे क्रीडा विकासाची गती राखण्याचे काम आणि क्रीडा प्रशासनात पारदर्शकता निर्माण होणार असल्याचे मत उषा यांनी मांडले. क्रीडा विधेयकावरील राज्यसभेत झालेल्या चर्चेदरम्यान उषा यांनी विधेयकातील राष्ट्रीय क्रीडा मंडळाच्या स्थापनेसह त्यातील तरतुदींचे विशेष कौतुक केले. सरकारकडून कुठलीही मदत घेण्यापूर्वी मंडळाची मान्यता आवश्यक असणार असून, संघटनांची मान्यता ठरविण्याचा अधिकारही मंडळाचा असणार आहे. यामुळे देशातील क्रीडा संघटनांच्या कामकाजात निश्चितपणे पारदर्शकता येण्याचा विश्वासही उषा यांनी व्यक्त केला.क्रीडा परिसंस्थेतील वाद मिटविण्यासाठी क्रीडा न्यायप्राधिकरणाची आणि निवडणुकांवर देखरेख ठेवण्यासाठी क्रीडा निवडणूक समितीची स्थापना हे दोन्ही प्रस्ताव महत्त्वाचे असल्याचेही उषा यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

उषा यांनी यावेळी आपल्या १९८४ लॉस एंजलिस ऑलिम्पिकची आठवण सांगितली. ''तेव्हा माझे ऑलिम्पिक पदक थोडक्यात हुकले होते. मी खूप निराश होते. पण, त्यातूनही बाहेर पडण्याची जिद्द होती. पण, तेव्हा आमच्या स्वप्नांना बळ देण्यासाठी कोणताही व्यापक क्रीडा कायदा भारतात नव्हता. चार दशके उलटून गेल्यानंतरही ही स्थिती बदललेली नव्हती. मात्र, आता विधेयकामुळे खेळाडूंच्या स्वप्नांनाही बळ मिळणार आहे. निश्चितपणे हे भारतीय क्रीडा परिसंस्थेला आवश्यक असलेले हे एक दूरदर्शी विधेयक आहे,'' असे उषा म्हणाल्या.

भारत ऑलिम्पिक स्पर्धा आयोजनाचे स्वप्न बघत असताना हे विधेयक आले आहे. यामुळे जागतिक क्रीडा क्षेत्रात भारताला वेगळे स्थान मिळेल. योग्य कृतीसाठी हे विधेयक एक स्पष्ट विचार आहे, असेही उषा यांनी नमूद केले. राष्ट्रीय उत्तेजक विरोधी विधेयकही आणल्यामुळे भारत स्वच्छ खेळाची एक नवी संस्कृती आणू शकेल आणि खेळाडूंचा मार्ग स्पष्ट करेल, असेही उषा यांनी यावेळी सांगितले.विधेयकामुळे क्रीडा प्रशासनात पारदर्शकता आणि जबाबदारीची भावना निर्माण होईल. लिंग समानतेला चालना मिळेल. खेळाडू सक्षम बनतील आणि प्रायोजकांबरोबर महासंघांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल. - पी. टी. उषा, 'आयओए' अध्यक्ष.

# ग्रामदैवत श्री सिध्देश्वराची जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते महाआरती





लातूर/प्रतिनिधी : पवित्र श्रावण महिना सुरू असून या महिन्यात भगवान शंकराची आराधना करण्यात येते. याच पार्श्वभूमीवर श्रावण महिन्यातील तिसजया सोमवारचे औचित्य साधून ग्रामदैवत श्री सिध्देश्वर रत्नेश्वराची महाआरती जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते करण्यातआली. तसेच यावेळी सहधर्मादाय आयुक्त ससाणे यांनीही आपल्या पत्नीसमवेत आरती केली.

श्रावण महिना सुरू असून या महिन्यात भगवान शंकराची आराधना अतिशय मनोभावे करण्यात येते. विशेषत: श्रावण महिन्यात सोमवारी अनन्य साधारण महत्व आहे. त्यामुळेच तिसजया सोमवारचे औचित्य साधून लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानला भेट देवून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर -घुगे यांच्या हस्ते श्री सिध्देश्वराची महाआरती करण्यात आली. यावेळी सहधर्मादाय आयुक्त ससाणे यांनीही आपल्या पत्नीसमवेत श्री सिध्देश्वराची महाआरती केली. यावेळी देवस्थानचे ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे, प्रशासक सचिन जांबूतकर, अशोक भोसले, महाआरती समितीप्रमुख विशाल झांबरे, तलाठी दत्ता शिंदे, सचिन आलमले, तुकाराम जगताप, अनिकेत जाधव, आकाश सौदागर आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी देवस्थानच्या वतीने ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांचा सत्कार केला. यावेळी देवस्थान परिसरात सुरु असलेल्या तिर्थकुंडाच्या कामाची पाहणी जिल्हाधिकारी यांनी करून या कामास निधी कमतरता पडणार नाही, अशी ग्वाही दिली.

## अभाविप नांदेड महानगरतर्फे रक्षाबंधन उत्साहात साजरा




**नांदेड/प्रतिनिधी:** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद नांदेड महानगराच्या वतीने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात रक्षाबंधन सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने अभाविप कार्यकर्त्यांनी प्रकुलगुरु सर, प्राध्यापक तसेच विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना राखी बांधून बंधुत्व व ऐक्याचा संदेश दिला.

या कार्यक्रमात महानगर मंत्री ऋषिकेश काळे, देवगिरी प्रदेश टी. एस.वी.के. सहसंयोजक हरिजिंदर सिंग, सोशल मीडिया सहसंयोजक रिया रोडे, महानगर कला मंच संयोजक प्रार्थना हळदेकर, महानगर विद्यार्थिनी कार्य सहप्रमुख गायत्री डांगे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान अभाविप कार्यकर्त्यांनी भारतीय संस्कृतीतील रक्षाबंधन सणाचे महत्त्व सांगत, शिक्षक व कर्मचाऱ्यांसोबत स्नेहभाव वृद्धिंगत करण्याचा संकल्प व्यक्त केला. उपस्थितांनी अभाविपच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

## नवभारत विद्यालयात सायबर सुरक्षा कार्यशाळा



**लातूर/प्रतिनिधी:** राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या Cyber Shiksha for Cyber Suraksha उपक्रमांतर्गत नवभारत विद्यालयात सायबर सुरक्षा कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागातील 'सायबर वॉरियर्स' ओमकार सूर्यवंशी व अर्जुन चव्हाण यांनी सोशल मीडिया सुरक्षितता, फिशिंग ईमेल/मेसेज ओळख, मोबाईल व ब्राउझर सुरक्षा, मजबूत पासवर्ड, 2FA, डिजिटल फसवणूक व आर्थिक ठगी प्रतिबंध यावर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत सायबर गुन्हा नोंदणी प्रक्रिया, सायबर सेल, हेल्पलाईन क्रमांक १९३० यांची माहिती देण्यात आली. प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

मुख्याध्यापक संतोष कदम, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे कौतुक करून पुढील काळात अशा कार्यशाळा सातत्याने राबविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

## जागतिक विकासात युवाशक्ती अग्रेसर असायला हवी : प्रा. डॉ. भिसे

बाभळगाव : जगभरातील युवकांचे सामाजिक सांस्कृतिक आणि राजकीय समस्याकडे लक्ष वेधण्याकरिता आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. भारतात युवाशक्ती आज दिशाही झाली असली तरी निराश होण्याचे कारण नाही. व्यसन आणि अंधश्रद्धेच्या आहारी गेलेले युवक दिवसेंदिवस कमी होत आहेत. या संकटातून बाहेर पडणारा युवक जागतिक विकासात अग्रेसर असायला हवा, असे मत प्रा. डॉ.दशरथ भिसे यांनी केले.महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई, अंतर्गत रेड रिबन क्लब व दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगाव संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या क्खत व एड्स प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. दशरथ भिसे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते तर यावेळी प्रमुख पाहुणे अरुण कुमार गवळी, जिल्हा शल्य चिकित्सक सार्वजनिक आरोग्य विभाग, लातूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रारंभी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सुरेशकुमार कांबळे कार्यक्रमाचे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषिकेश सुरवसे यांनी केले तर आभार गणेश साखरे यांनी मानले. कार्यक्रमासाठी मजर शेख, ऋषिकेश रेणके, ओम भाडुळे, विशाल थाटे, बालाजी सुरवसे, निखिल भारती, कृष्णा धामणगावे आदित्य थाटे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना सर्व समन्वयक मंडळ, सल्लागार, प्राध्यापक, विद्यार्थी , शिक्षकेत्तर कर्मचारी व माजी विद्यार्थी ओमकार सुरवसे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घर नव्याने पुन: बांधले पाहिजे, जळमटांना जुन्या जाळले पाहिजे : डॉ. मुकुंद राजपंखे

लातूर : वाचनाची गोडी, साहित्याची जाण आणि पुस्तकांचे महत्त्व विद्यार्थीदशेतच विद्यार्थ्यांनी समजून घेतले पाहिजे. कोणतीही गोष्ट साध्य करण्यासाठी सातत्याने झटले पाहिजे, असे प्रतिपादन करताना प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे यांनी त्यांच्या गाजलेल्या गझलेतील घर नव्याने पुनः बांधले पाहिजे, जळमटांना जुन्या जाळले पाहिजे आणि माझा बाप, माझ्या देव या ओळींद्वारे उपस्थितांच्या मनात नवचेतनेचे अंकुर रोवले. तसेच आई, वडील आणि प्रेम या विषयांवरील बहारदार कवितांचे सादरीकरण करून त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सुप्रसिद्ध कवी, गझलकार, वाङ्मयीन अभ्यासक आणि यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई येथील इंग्रजी विभागप्रमुख म्हणून त्यांच्या साहित्यिक प्रवासाचा अनुभवही त्यांनी उपस्थितांसमोर मांडला.




दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त पुस्तकांवर बोलू काही...! या विषयावर व्याख्यान व निवडक ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर तर प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी.टी.चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर यांची होती. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय लावून घेतली पाहिजे आणि पुस्तकातून मिळणारे ज्ञान आयुष्यभरासाठी वापरले पाहिजे असे सुतोवाच त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस ग्रंथालयामध्ये निवडक ग्रंथांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ.मुकुंद राजपंखे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. विठ्ठल जाधव यांनी केले, पाहुण्यांचा परिचय प्रा. अनुजा कांबळे, सूत्रसंचालन डॉ. आकांक्षा भांजी यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. शैलजा चिकटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथालय लिपिक लक्ष्मीकांत वाघ यांच्यासह सर्व ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सरस्वती महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा



**लातूर/प्रतिनिधी:** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी ग्रंथालयशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस.आर.रंगनाथन यांची जयंती राष्ट्रीय ग्रंथपाल दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ.राम बोरगावकर सर यांनी पद्मश्री डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले.

याप्रसंगी ' वाचन संस्कृती वाढ व विकास ' या विषयावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून आपले विचार व्यक्त करताना प्रा.डॉ.बालाजी शिंदे म्हणाले की, प्रत्येकानी दररोज वाचन करून आपल्या ज्ञानात भर घालावी, वाचनाने व्यक्तीचा आत्मविश्वास वाढतो.समाजाला विधायक मार्ग दाखविण्यासाठी आणि समाज साक्षर करण्यासाठी ग्रंथ हेच चांगले मित्र आहेत. ग्रंथालयातील उपलब्ध वाचन साहित्य जसे कथा, कादंबरी, कविता, आत्मचरित्र, व्यक्तिमत्व विकास, स्पर्धा परीक्षा, वाचनीय मासिके इत्यादी इत्यादी उपलब्ध वाचन साहित्याचे प्रत्येकाने वाचन करून वाचन संस्कृती वृद्धिंगत केली पाहिजे. ग्रंथालयांना जास्तीत जास्त लोकाभिमुख बनविणे त्याचा उपयोग सर्वसामान्यांना व्हावा यासाठी पद्मश्री डॉ. एस.आर.रंगनाथन यांनी ग्रंथालयाचे पंचसूत्री तयार केली. ज्या आधारावर ग्रंथालयशास्त्राचा पाया रचला गेला आहे. असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुदाम पवार, ग्रंथपाल प्रा.रवि चव्हाण, प्रा. डॉ. बालाजी शिंदे, प्रा.अमोल जाधव, प्रा. डॉ.वसंत बंडे, प्रा. पांडुरंग गोरे,प्रा.सलील शहाजिंदे, प्रा. तुकाराम येमले,डॉ.राम खलंग्रे, प्रा. श्रीमंत दोरवे, प्रा.डॉ.संतोष कुलकर्णी, प्रा .डॉ. मोनालिसा खानोरकर,प्रा.ज्योती मामडगे,श्री.शशिकांत सोळुंके, श्री. विठ्ठल चव्हाण,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा.रवि चव्हाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ.सुदाम पवार यांनी आभार मानले.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात डॉ.एस.आर. रंगनाथन यांची जयंती उत्साहात साजरी




**लातूर/प्रतिनिधी:** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी डॉ.एस.आर.रंगनाथन यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या.यावेळी ते असेही म्हणाले की,डॉ.एस.आर.रंगनाथन हे भारतीय ग्रंथालयशास्त्रज्ञ आणि आधुनिक भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक म्हणून ओळखले जातात.त्यांनी ग्रंथालयशास्त्रात मोलाचे योगदान दिले.त्यांच्या कार्यामुळे भारतातील ग्रंथालये अधिक लोकाभिमुख झाली.ग्रंथालय हाच शिक्षणाचा खरा आत्मा आहे.

याप्रसंगी पर्यवेक्षिका डॉ. संध्या वाडीकर,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर,ग्रंथपाल प्रा.किरण भिसे,प्रा.बळवंत सूर्यवंशी,बाळू क्षीरसागर,खंडू सरतापे,संजय मुंडे,शंकुतला हालसे,शिवकन्या माने,सविता जाधव,सौ.राठोड यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयामध्ये,ग्रंथालय आणि माहिती शास्त्राचे जनक पदमश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती उत्साहात साजरी



**लातूर/प्रतिनिधी:** भारतीय ग्रंथालय क्षेत्रामध्ये अमूल्य योगदान देऊन क्रांती करणारे,ग्रंथालय क्षेत्राचा दर्जा सुधारण्यासाठी ज्यांनी आयुष्य वेचले ते पदमश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा जन्मदिवस अखिल भारतीय स्तरावर्ती राष्ट्रीय ग्रंथपाल दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने ग्रंथालय आणि माहिती शास्त्राचे जनक पदमश्री डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेस प्राचार्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयामध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रंथपाल दीना निमित्य ग्रंथालय आणि माहिती शास्त्राचे जनक पदमश्री डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकून त्यांनी भारतीय ग्रंथालय शास्त्राला दिलेले योगदान आणि कार्यबद्धल माहिती देण्यात अली, वाचन संस्कृती रुजवण्यासाठी त्यांनी ग्रंथालय चळवळ उभारणीला सुरवात केली ग्रंथालयासाठी व वाचकांसाठी एक पंचसूत्री अमलात आणली. आणि त्या पंचसूत्रीच्या माध्यमातून ग्रंथालय उभारणीला बळ मिळत गेले.

प्रत्येक वाचकाला त्याचा ग्रंथ मिळाला पाहिजे, आणि प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळाला पाहिजे या विचारधारेने ग्रंथालयाच्या माध्यमातून वाचकांच्या माहितीच्या गरजा पूर्ण होण्यास मदत मिळाली. अश्या कार्याचे गुण वर्णन करून ग्रंथपाल रामेगावकर प्रदीप यांनी ग्रंथालयातील वाचन साहित्याची अद्यावत माहिती सर्व विध्यार्थ्यांना दिली अद्यावत माहिती साधनांच्या माध्यमातून विद्यार्थ्याने विध्वत्ता आत्मसात करून अधिकाधिक यश संपादन करावे अशी माहिती देण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजेंद्र स्वामी सर प्राचार्य डॉ. संजय थोंटे सर प्रा. प्रताप भोसले ग्रंथपाल,रामेगावकर प्रदीप डॉ.भुसनुरे ओ जि. डॉ. देशपांडे प्रा. कौडेवार आर.डी प्रा. हुच्चे बी.एस. प्रा.सुगावे रामलिंग प्रा.मानके प्रा.मठपती अविनाश कार्यालयीन अधीक्षक शिवहार विभुते सिद्धेश्वर स्वामी ग्रंथालय कर्मचारी गर्जे मनोज स्वामी नागेश व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## मान्सूनपूर्व पावसाने ४५१ हेक्टर पिकांचे नुकसान: कळंब तालुक्यातील ९६१ शेतकऱ्यांच्या पिकांना बसला होता फटका



कळंब (प्रतिनिधी)- मे महिन्यात कळंब तालुक्यातील ६१ गावांना अतिवृष्टीने झोडपले होते. या पूर्वमोसमी पावसामुळे तालुक्यातील ९६१ शेतकऱ्यांच्या ४५१ हेक्टरवरील शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. भरपाई म्हणून ८५ लाख ३० हजार ८५० रुपये मंजूर झाले आहेत. याचे वितरण सुरू झाले असून शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

मे महिना हा शेतकऱ्यांसाठी महत्वाचा समजला जातो. या महिन्यात शेतकरी लगबगीने उन्हाळी कामे उरकून खरिपाचे नियोजन करतात. यावर्षीही शेतकऱ्यांनी मे महिन्यात शेतीकामे हाती घेतली होती. १० मे नंतर ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. थोड्या प्रमाणात पाऊस येईल, असे वाटत होते. मात्र, मे महिन्यात मान्सूनपूर्व पावसाने अक्षरशः थैमान घातले. उन्हाळी पिकातून काही पैसे मिळतील आणि खरीप हंगामाला हातभार लागेल, या आशेवर अनेक शेतकऱ्यांनी कांदा व इतर पालेभाज्यांची लागवड केली होती. मात्र या अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान झाले. विशेष म्हणजे मे महिन्याच्या सुरुवातीला आंब्याच्या बागेत धुईमुळे तुरगळ सुरू झाली होती.

शेतकऱ्यांनी महागड्या औषधांची फवारणी केली. त्यानंतर यावर्षी उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे आंब्यांची लहान अवस्थेतील फळांची गळ झाली. शेतकऱ्यांनी कशीबशी बाग वाचवली होती. मात्र, मोठ्या प्रमाणात मान्सूनपूर्व पावसाने पिकांचे नुकसान झाले होते.

बागायतीच्या २९६ हेक्टरला तडाखा मे महिन्यातील अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे महसूल व कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले. यात बागायती पिके २९६.८० हेक्टर, फळबाग पिके १५४.९० हेक्टर, असे एकूण ४५१.७० हेक्टरवरील शेतपिकांचे नुकसान झाल्याचा अहवाल प्रशासनाकडे पाठवण्यात आला होता.

## नगरप्रदक्षिणा, महाप्रसादाने नारळी पौर्णिमोत्सवाचीसांगता: येडेश्वरी देवीच्या महाआरतीनंतर पालखीची नगरप्रदक्षिणा



येरमाळा (प्रतिनिधी)- येथील येडेश्वरी देवीच्या नारळी पौर्णिमा उत्सवानिमित्त सोमवारी (दि.११) सकाळी १० वाजता कै. आबाजी पाटील यांच्या आनंदधाम निवासस्थानातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात देवीची महाआरती मानकरी व पुजारी मंडळींकडून करण्यात आली. यानंतर देवीची पालखी नगरप्रदक्षिणा करत ढोलताशांच्या व फटाक्यांच्या आतषबाजीसह अंभगांचा गजर करत नारळी पौर्णिमा यात्रोत्सवाची नगरप्रदक्षिणा व भंडारा महाप्रसादाने सांगता करण्यात आली.

श्री येडेश्वरी देवीच्या नारळीपौर्णिमा यात्रेची सुरुवात पाटील वाड्यातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहाने होऊन पौर्णिमेच्या आदल्या दिवशी पालखीचे आगमन, दहीहंडीसह पालखीची गाव प्रदक्षिणा करून मुख्य मंदिर परिसरात दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम पार पडला. रविवारी (दि.१०) सायंकाळी पालखीचे नगरप्रदक्षिणा व महाप्रसादासाठी विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आगमन झाले. सोमवारी (दि.११) सकाळी १० वा. पालखीची पालखीचे नगरप्रदक्षिणेसाठी प्रस्थान झाले. टाळमृदंग, आई राजा उदे उदे, विठोबा रखुमाई, ज्ञानोबा तुकारामच्या गजरात व ठिकठिकाणी टाळकरी, भजनी मंडळींनी टाळ मृदंगाच्या गजरात नृत्य, पाऊल, फुगडी खेळत ग्रामस्थ व भाविकांचे लक्ष वेधले. पालखी कै. आबाजी पाटील यांच्या वाड्यात आल्यानंतर भारुडरत्न कृष्णा महाराज जोगदंड (कामखेडा, जि. लातूर) यांनी भारुड, गवळण, विविध सोंगे सादर करून भाविकांच्या मनोरंजनासह समाजप्रबोधन केले. यावेळी गावातील, तसेच पंचक्रोशीतील भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. वाड्यातून पालखी निघून गुरव गल्ली बाजार चौकातून विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आल्यानंतर श्री. येडेश्वरी देवीच्या पालखीची महाआरती, विठ्ठल रुक्मिणीची महाआरती देवीचे मानकरी अमोल पाटील, यशवंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आली. नारळी पौर्णिमा यात्रेच्या हरिनाम सप्ताहात सेवा देणाऱ्या वारकरी, टाळकरी, वादक, पालखीचे मानकरी, देवीचे पुजारी यांचा श्रीफळ, ज्वारीच्या लाह्यांचा प्रसाद देऊन कै. आबाजी पाटील कुटुंबीयांकडून सत्कार करण्यात आला.भंडारा महाप्रसादाच्या वाटपाने नारळीपौर्णिमा यात्रेची सांगता करण्यात आली.

पालखीचे घेतले दर्शन, खेळल्या फुगड्या आई श्री येडेश्वरी देवीच्या नारळी पौर्णिमा महोत्सवाची सांगता होत असताना सकाळी १० वाजता देवीची महापूजा करण्यात आली. यानंतर देवीची पालखी नगरप्रदक्षिणा सुरू असताना आमदार कैलास पाटील यांनी पालखीचे दर्शन घेतले. देवीचे मानकरी अमोल पाटील यांच्यासोबत फुगडी खेळत हरिनामाच्या गजरात देवीच्या पालखीला खांदा देत मनोभावे दर्शन घेण्यात आले.

## जाळ्या लावून करणार उंदरांचा बंदोबस्त; मंदीर प्रशासन

तुळजापूर तुळजाभवानी मंदिरात उंदरांनी धुमाकूळ घातला असून मंदिर बंद केल्यानंतर थेट तुळजाभवानी मातेच्या गाभाऱ्यात उंदरांचा संचार असल्याचे तुळजाभवानी मातेच्या ऑनलाइन दर्शनादरम्यान दिसून येत आहे. दरम्यान, मंदिर संस्थानने उपाययोजना सुरू केली असून ८ दिवसात नियंत्रण येईल, असे सांगितले आहे. गुजरातमधील भावनगर येथील हितेशभाई जानी या भाविकाने यांनीही याबद्दल नाराजी व्यक्त केली असून उंदरांना तत्काळ बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. मंदिर बंद केल्यानंतर रात्रभर अनेक उंदीर तुळजाभवानी मातेच्या गाभाऱ्यात वावरत असल्याचे ऑनलाइन दर्शनातून स्पष्ट दिसून येत आहे. या उंदरांमुळे तुळजाभवानी मातेच्या प्राचीन अलंकारांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. भावनगर येथील भाविक हितेषभाई यांनी पुजारी विजय भोसले यांना सोशल मीडियावर मेसेज पाठवत शुक्रवारी (दि.८) रात्री ११ वाजेच्या सुमारास तुळजाभवानी मातेच्या गाभाऱ्यात उंदीर संचार करत असल्याचा व्हिडिओ पाठवला. तसेच याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. मातेच्या गाभाऱ्यात उंदीर मान्य नसल्याचे सांगत हितेषभाई यांनी मंदिर संस्थानने उंदरांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.

## दुर्गंधीयुक्त पाण्याची लवकर विल्हेवाट लावा: नळदुर्ग नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन



नळदुर्ग (प्रतिनिधी)- बसस्थानकात असलेल्या शौचालयातील दुर्गंधीयुक्त पाणी समोरील गटारीत सोडल्यामुळे रोगराई पसरून दुकानदारांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने घाण पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी उपाययोजना करावी, अशा मागणीचे निवेदन व्यापाऱ्यांनी नळदुर्ग नगरपरिषदेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांना दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नळदुर्ग बसस्थानकासमोर बांधण्यात आलेल्या गटारीत बसस्थानकातील शौचालय चालकाने दुर्गंधीयुक्त घाण पाणी सोडले आहे. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे. तसेच यामुळे परिसरात वराहांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे परिसरातील दुकानदारांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने गटारीतील दुर्गंधीयुक्त घाण पाणी मोठे पाइप टाकून इतर ठिकाणी सोडावे व दुकानदारांनी अडचण दूर करावी. निवेदनावर मेहबूब शेख, सज्जाद बागवान, संजय बेले, सातलिंगप्पा मेंडके, आयुब कुरेशी, नितीन पुदाले, संतोष कलशेट्टी, तय्यब बागवान, सत्तार शेख, गोस बागवान यांच्यासह व्यापारी व रिक्षाचालकांच्या स्वाक्षरी आहेत.

## घाटात एसटी बंद; प्रसंगावधानामुळे टळला अपघात: बार्शी-धाराशिव मार्गावरील घटना



धाराशिव (प्रतिनिधी)- बार्शी-धाराशिव मार्गावर हातलाईच्या पुढे आल्यानंतर हनुमान चौकाच्या पाठीमागील घाटात शनिवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास अचानक एसटी बस बंद पडली. बार्शी आगारातून रात्री ८:१५ वाजता सुटलेली (एमएच-१४, आरटी-४२८५) क्रमांकाची एसटी बस शनिवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास अचानक बंद पडताच चालकाने प्रसंगावधान राखून बस जागेवर उभी केली. त्यानंतर तात्काळ बसमधील सर्व ३२ प्रवाशांना खाली उतरवले. यामुळे अपघाताचा प्रसंग टळला.

मात्र १ तास प्रतीक्षा करूनही एकही बस न आल्याने प्रवाशांना रात्री ९.३० वाजता थेट चालतच धाराशिवचे बस स्थानक गाठावे लागले. त्यानंतर दुसऱ्या घटनेत रविवारी दुपारी १ .३० वाजेच्या सुमारास बार्शी-धाराशिव रस्त्यावरील शेलगाव येथे बार्शी-धाराशिव (एमएच-११, बीएल-९३३५) ही एसटी बस अचानक बंद पडली. त्यामुळे बसमधील ६० प्रवाशांना तब्बल एक तासाहून अधिक रस्त्यावरच उभे राहावे लागले. एक तासानंतर आलेल्या बसमध्येही प्रवाशांना न घेतल्याने प्रवाशांना खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागला. बार्शी-धाराशिव मार्गावर वारंवार बंद पडणाऱ्या बसेस धावत असल्याने प्रवाशी त्रस्त झाले आहेत. कालबाह्य बसेस मार्गावर धावत असल्याने एसटी प्रवाशांना बंद पडणाऱ्या बसेसचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. प्रवाशांसह एसटीचे चालक-वाहकही जुन्या भंगार बसेसमुळे वैतागले आहेत. मात्र याकडे एसटी महामंडळाचे अधिकारी गांभीर्याने पाहत नसल्याचा सूरही एसटी कर्मचाऱ्यांसह प्रवाशांतून उमटत आहे.

## पालावरील अभ्यासिकेत दररोज २५३ विद्यार्थी घेतात शिक्षण...

धाराशिव गावोगावी विखुरलेल्या हातावर पोट असलेल्या भटक्या समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी धाराशिवच्या भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान परिषदेतर्फे गत १५ वर्षापासून जिल्ह्यात ८ ठिकाणी पालावरील अभ्यासिका उपक्रम सुरू आहे. यातून दररोज सायंकाळी २५३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या माध्यमातून आजपर्यंत सहा हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आले आहेत.

धाराशिव शहरातील वडार गल्ली, बंजारा वस्ती, वासुदेव वस्ती, उमरग्यात मसनजोगी भिल्ल समाज वस्ती, नळदूर्ग येथे मरिआई समाज वस्ती, तुळजापुरात हंगरगा व तुळजापूर शहरात वैद्य समाज वस्ती, येडशीत राजगुंड समाज वस्ती येथे ८ ठिकाणी पालावरच्या अभ्यासिकेतून २५३ हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षणापासून दूर गेलेले ३०० हून अधिक पहिलीचे विद्यार्थी विविध शाळांत दाखल झाले आहेत.

अभ्यासिकेमुळे अनेकांना दहावी, बारावीसह उच्च शिक्षण घेता आले. भटक्या समाजाच्या वस्तीतल्या मुलांना अक्षरज्ञान, लेखन, वाचनाचे धडे अभ्यासिकेच्या शिक्षिका रेणुका जाधव, स्वाती सातपुते देत आहेत. अर्धवट शिक्षण सोडलेल्या मुलांना शाळेत पाठवण्यासाठी पुढाकार घेत आहेत. भटक्या समाजातील मुलांच्या शैक्षणिक अडचणी ओळखून त्यांना शैक्षणिक साहित्य, खाऊ वाटप केले जाते.

धाराशिवमध्ये वडार वस्ती अभ्यासिकेत-४२ विद्यार्थी, बंजारा वस्ती-४४, वासुदेव वस्ती-३६ विद्यार्थी तर जिल्ह्यात ८ ठिकाणी एकूण २५३ विद्यार्थी दररोज सायंकाळी ५ ते ७ या वेळेत अभ्यासिकेत येतात. आजपर्यंत प्रतिष्ठानने शासनाच्या पुढे पाऊल टाकत भटक्या समाजातील ५८५८ विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आणले आहे. हा उपक्रम प्रतिष्ठानचे अध्यक्ष उद्धव काळे, निरीक्षक शेखर पाटील आदींच्या सहकार्याने सुरू आहे.

भटके विमुक्तांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणेसाठी प्रतिष्ठानतर्फे महिला बचत गट निर्मिती, महिलांना व्यवसाय प्रशिक्षण, आरोग्य शिबिर, लसीकरण घेतले जाते. शासकीय शिबिरांतून विविध कागदपत्रं काढून दिल्याने अनेकांना विविध शासकीय योजनांसाठी फायदा झाला.

## परंडा पोलीस ठाणे परिसरात आरडा ओरड करणाऱ्या मद्यपीवर गुन्हा दाखल

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत खॉजा रा. बावची ता. परंडा जि. धाराशिव हे दि.११.०८.२०२५ रोजी पोलीस ठाणे परंडा समोरील बार्शी ते परंडा रोडवर मद्यधुंद अवस्थेत आरडा ओरड करून गोंधळ घालताना परंडा पो. ठा. च्या पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.


**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : - **SURYWANSHI SHRIHARI MAHADEV.** TO: **SHRIHARI MAHADEV SURYAWANSHI.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **SHRIHARI MAHADEV SURYAWANSHI** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SURYWANSHI SHRIHARI MAHADEV.**
NEW NAME :- **SHRIHARI MAHADEV SURYAWANSHI.**
Address - AT POST THERGAON, SHIRUR ANANTPAL, DIST.LATUR. -413524.
Adhar no.- 737116622921
Mob. No.-9657500597



**लातूर समाचार उस्मानाबाद**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**


## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649